अहवाल क्रमांक :१३०

पंचायती राज समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या
सन २००३-२००४ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन
अहवालातील अकोला, वाशिम व सिंधुदूर्ग जिल्हा परिषदांच्या संदर्भातील परिच्छेदाबाबत.

पाचवा अहवाल

(सदर अहवाल दिनांक २१ एप्रिल, २०११ रोजी विधानसभेस/ विधानपरिषदेस
सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०११

पंचायती राज समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या
सन २००३-२००४ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील
अकोला, वाशिम व सिंधुदूर्ग जिल्हा परिषदांच्या संदर्भातील परिच्छेदाबाबत.

पाचवा अहवाल

(तीन)

पंचायती राज समिती
(२०१०-२०११)
(दिनांक ४ मार्च, २०१०)

समिती प्रमुख

१ श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.

समिती सदस्य

२ ॲड, के.सी.पाडवी, वि.स.स.

३ श्री. माधवराव पवार, वि.स.स.

४ श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

५ श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

६ श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

७ श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

८ श्री. बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.

९ श्री. उदय सामंत, वि.स.स.

१० श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

११ श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.

१२ श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१३ श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

१४ श्री. सुरेश खाडे, वि.स.स

१५ श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

१६ श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

१७ श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

१८ श्री. विजयराव औटी, वि.स.स.

१९ श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

२० श्री. नितीन भोसले, वि.स.स.

(चार)

२१ प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

२२ श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२३ ॲड. उषा दराडे, वि.प.स.

२४ श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

२५ श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव,

श्री. ना.रा.थिटे, अवर सचिव,

(पाच)

पंचायती राज समिती
(२००८-२००९)
(दिनांक १४ ऑगस्ट २००८ पासून)

समिती प्रमुख

१. श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स.

समिती सदस्य

*२. श्री.राजन पाटील, वि.स.स.

३. श्री.रमेशभाई कदम, वि.स.स.

४ श्री.माणिकराव जगताप, वि.स.स.

५ श्री.संपतराव अवघडे, वि.स.स.

६ श्री.श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

**७ रिक्त

८ श्री.पी.एन.पाटील, वि.स.स.

९ श्री. सुभाष बने, वि.स.स.

१० श्री.राजेंद्र मुळक, वि.स.स.

११ श्री.पद्माकर वळवी, वि.स.स.

१२ श्री.डी.एस.अहिरे, वि.स.स.

१३ श्री.आशिष जयस्वाल, वि.स.स.

१४ श्री.तुकाराम सुर्वे, वि.स.स.

१५ श्री.अण्णासाहेब माने-पाटील, वि.स.स.

१६ श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

१७ श्री. अतुल देशकर, वि.स.स.

१८ श्री. टी.पी.कांबळे, वि.स.स.

१९ श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

२० श्री.हेमंत पटले, वि.स.स.

(सहा)

२१ श्री.राजन तेली, वि.प.स.

२२ श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

२३ श्री.विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.

२४ श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

२५ श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री.अनंत कळसे, प्रधान सचिव,

श्री.भा.ना.कांबळे, सह सचिव,

श्री.वि.वा.देशमुख, उप सचिव,

श्री.ता.नि.मिसाळ, अवर सचिव,

---

* सन्माननीय सदस्य श्री.नानाभाऊ पंचबुद्धे यांचा मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समावेश झालेला असल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर सन्माननीय सदस्य श्री.राजन पाटील, वि.स.स. यांची दिनांक २९ जानेवारी, २००९ रोजी नामनियुक्ती करण्यात आली.

** सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांचा मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समावेश झालेला असल्यामुळे पद रिक्त.

(नऊ)

प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा पाचवा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१०-२०११ करिता समिती दिनांक ४ मार्च, २०१० रोजी गठित झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय व महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सन २००८-२००९ साठी गठीत झालेल्या समितीने अकोला, वाशिम व सिंधुदूर्ग या जिल्हा परिषदांची सखोल तपासणी केली.

समितीने अकोला जिल्हा परिषदेस दिनांक २५ ते २७ सप्टेंबर, २००८ रोजी भेट देऊन श्री.नितिनकुमार खाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.वा.वा.खर्चे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, अकोला जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने वाशिम जिल्हा परिषदेस दिनांक २० ते २३ ऑक्टोबर, २००८ रोजी भेट देऊन श्री.विक्रमकुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.बी.बी.जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रभारी), वाशिम जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने सिंधुदूर्ग जिल्हा परिषदेस दिनांक २८ ते ३१ जानेवारी, २००९ रोजी भेट देऊन श्री.राहुल रंजन महिवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.एस.बी.शेळके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी (वरिष्ठ), सिंधुदूर्ग जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

सन २०१०-२०११ करिता गठीत झालेल्या समितीने अकोला, वाशिम व सिंधुदूर्ग जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या, तसेच साक्षीचे वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने अनुक्रमे दिनांक ६ ऑक्टोबर, २०१० रोजी जिल्हा परिषद अकोला संदर्भात, दिनांक २७ ऑक्टोबर, २०१० रोजी जिल्हा परिषद वाशिम व दिनांक १५ नोव्हेंबर, २०१० रोजी जिल्हा परिषद सिंधुदूर्ग संदर्भात मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

(दहा)

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. ठाकरे, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, श्री.गिरिराज, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (रो.ह.यो.) विभाग, श्री.अनिल डिग्गीकर, सचिव, कृषि व पदुम (पशुसंवर्धन) विभाग, श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

तसेच जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने केलेल्या कामकाजाचा संक्षिप्त वृत्तांत अहवालाच्या शेवटी "परिशिष्ट" म्हणून जोडण्यात आला आहे.

लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या अकोला, वाशिम व सिंधुदूर्ग जिल्हा परिषदांच्या कामकाजांची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत..

सन २०१०-२०११ साठी गठित झालेल्या समितीने दिनांक १८ एप्रिल, २०११ रोजी च्या बैठकीत अहवाल विचारात घेऊन संमत केला.

विधान भवन :
नागपूर,
दिनांक : १८ एप्रिल, २०१०.

बबनराव शिंदे,
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती

(अकरा)

अनुक्रमणिका

अ.क्र.	प्रकरण क्रमांक	विषय	परिच्छेद क्रमांक	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	१.१	**प्रकरण एक** **अकोला जिल्हा परिषद** रोजगार हमी योजनेअंतर्गत अग्रिम घेवूनही विहिरीची कामे सुरु न केलेल्या लाभार्थ्यांकडून रु.१,०५,२००/- चे अग्रिम व्याजासह वसुल करण्याबाबत.	३.२०८	
	१.२	एकाच कामची अनेक तुकड्यात विभागणी करुन वरिष्ठ स्तरावरील प्रशासकीय मंजुरी टाळणेबाबत.	३.१३१	
२	२.१	**प्रकरण दोन** **वाशिम जिल्हा परिषद** विशेष घटक योजनेअंतर्गत अनुसूचित जातीच्या / नवबौद्ध लाभर्थ्यांकडील पशुधनांना जंतनाशके व क्षार मिश्रणे पुरविण्याबाबत.	३.४०६	
३	३.१	**प्रकरण तीन** **सिंधुदूर्ग जिल्हा परिषद** अखर्चित अनुदान रक्कमाबाबत	३.२४४	

प्रकरण एक

अकोला जिल्हा परिषद

१.१ रोजगार हमी योजनेअंतर्गत अग्रीम घेवुनही विहीरीची कामे सुरु न केलेल्या लाभार्थ्यांकडुन रु.१,०५,२००/- चे अग्रीम व्याजासह वसुल करण्याबाबतः-

(परिच्छेद क्र. ३. २०८)

सन २००३-२००४ लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात रोजगार हमी योजनेअंतर्गत अग्रीम घेवूनही विर्हीरीची कामे सुरु न केलेल्या लाभार्थ्यांकडून अग्रीम वसुल करण्याबाबत या अकोला जिल्हा परिषदेच्या मुद्दया संदर्भात लेखापरीक्षकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेतः-

रोजगार हमी योजनेअंतर्गत सन १९८८-८९ ते १९९७-९८ या कालावधीत जवाहर विहीरी कार्यक्रमातर्गत विहीरी खोदण्यासाठी लाभार्थींनी अग्रीम घेवुनही सन २००३-०४ वित्तीय वर्षापयंर्त एकुण २२ लाभाथ्यांर्नी विहीरी खोदण्याच्या कामाला प्रारंभ केला नसल्याचे उपलब्ध अभिलेख्याबाबत निदर्शनास आले.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.नियोजन विभाग, जलसंधारण विभाग २०००/५१-६५ /रो.ह.यो-१० दि. २ जून २००० नुसार सन १९८८-८९ ते १९९७-९८ ह्या कालावधीत ज्या विहीरीची कामे लाभाथ्यांर्नी अग्रीम घेवुन सुरुच केली नाहीत. अशा लाभार्थींकडुन अग्रीम १८ टक्के व्याजासह रक्कम वसुल करावयाची आहे. त्यामुळे सदर लाभाथ्यांर्कडुन अग्रीम राशी शासन निर्णयानुसार व्याजासह वसुल करणे आवश्यक आहे. उचित कार्यवाही करुन लेखा परिक्षणास पुर्तता दाखविण्यात यावी.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद अकोला यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला.

रोजगार हमी योजनाअंतर्गत जवाहर विहीरी कार्यक्रमातून सन १९८८-८९ ते १९९७-९८ या कालावधीतील वित्तीय वर्ष २००३-०४ पर्यंत २४ लाभाथ्यांर्नी अग्रीम घेवुन अद्यापपर्यंत विहीरीचे काम सुरु केलेले नाही. अशा उपरोक्त लाभाथ्यांर्कडून विहीरीचे काम सुरु करण्याकरिता उपविभागाकडून संबंधीतास लेखी तसेच शाख अभियंता यांच्या मार्फत वेळोवेळी सुचना देण्यात आल्या आहे. त्यानुसार शे.महमुद, या लाभार्थ्याने विहीर पुर्ण केली असुन उर्वरित २३ लाभाथ्यांर्नी विहीरीचे कामास सुरुवात केली नाही. त्यामुळे उपरोक्त २३ लाभार्थ्यांकडुन दिलेले अग्रीम १८% व्याजासह वसुल करण्याचे RRC प्रस्ताव जिल्हाधिकारी, अकोला यांचेकडे पत्र.क्र.जिप/लसिवि/जवि/३२०२ दि.६.१०.२००५ नुसार

तसेच नझुल तहसीलदार, अकोला यांना पत्र क्र.८९५ दि.२४-४-२००७ नुसार सादर करण्यात आलेले आहेत. उपअभियंता लघुसिंचन उपविभाग यांनाही याबाबत पुनश्च पाठपुरावा करण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र.१३४३ दि.२८.८.२००८ नुसार सुचित केले आहे.

या कार्यालयाने RRC चे प्रस्ताव पुन्हा पत्र क्र जिप/लसिवि/जविका/१३९२ दि.६-९-२००८ नुसार, नझुल तहसीलदार, अकोला यांचेकडे पाठविले आहेत. तसेच कार्यालयाचे पत्र क्र. १४१२ दि. ९-९-२००८ अन्वये जिल्हाधिकारी, अकोला यांचेकडे पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अकोला यांची दिनांक २५ सप्टेंबर २००८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, २३ लाभाथ्यांर्नी विहीरीच्या कामास सुरुवात न केल्यामुळे त्यांच्याकडून १८ टक्के व्याजासह वसूली करण्याबाबत पाठविण्यात आलेल्या आरआरसीचा प्रस्तावाबाबतची सद्यस्थिती काय आहे त्यावर असा खुलासा करण्यात आला की, हा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात येऊन त्याबाबत पाठपुरावा करण्यासाठी दि. ६.९.२००८ रोजी तहसिलदार, अकोला यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, रोजगार हमी योजनेच्या निधीबाबतचा प्रस्ताव हा उप जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविणे आवश्यक असतांना आपण तो तहसिलदार यांच्याकडे कसा पाठविला तसेच दिनांक ९.९.२००८ च्या पत्रान्वये आपण जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडे कशाबाबतचा पाठपूरावा केला. त्यावर असे सांगण्यात आले की, आरआरसीच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्याकडे प्रस्ताव पाठविला. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "रोजगार हमी योजनेंतर्गत जवाहर विहिरीच्या कामासाठी अग्रीम घेऊन काम न करणाऱ्या लाभार्थ्यांविरुध्द वसूली करण्याबाबत आरआरसीचा प्रस्ताव सादर केला आहे. पंचायती राज समितीच्या पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात करण्यात आलेल्या शिफारशीनुसार प्राधान्याने वसूली करण्याबाबत कारवाई करण्यासाठी सहकार्य करावे.

त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, १५ वर्षापूर्वी आपण शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे चढविले. इतक्या वर्षापासून आपण वसूलीची कारवाई केली नाही याला मुख्य कार्यकारी अधिकारी जबाबदार आहेत. त्याबाबत आपण कडक भूमिका स्वीकारली पाहिजे. पंचायती राज समिती दौऱ्यावर येणार आहे म्हणून आपण आता ही करवाई करीत आहात काय त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी

असा खुलासा केला की, पालक मंत्र्यांच्या बैठकीमध्ये याबाबत चर्चा झाली असता जिल्हयामध्ये दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे वसुलीच्या कारवाईबाबत सौम्य भूमिका स्वीकारण्यात यावी.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, या योजनेमध्ये आपण लाभार्थी कसे निवडले ? अल्पभुधारक आणि अत्यल्प भुधारक शेतकऱ्यांना या योजनांचा लाभ कशाप्रकारे देण्यात आला त्यावर असे सांगण्यात आले की, या योजनेमध्ये २० टक्के अल्पभूधारक आणि २० टक्के मागासलेल्या लाभार्थींकरिता विहिरींचे वाटप करण्यात आले होते. एका विहिरीची किंमत ४५ हजार असून २३ लाभार्थ्यांना २,८०० रुपये अग्रीम वाटप करण्यात आले.

त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, काम सुरु करण्याकरिता सुरुवातीला आपण ५ हजार रुपये अग्रीम वाटप करतो. जवाहर विहिरीचे काम सुरु करीत असतांना सुरवातीला अग्रीम दिल्यानंतर एम.बी. रेकॉर्डप्रमाणे पैसे वाटप करावयाचे असतात. ५ हजारा ऐवजी ८ हजार रुपये अग्रीम देणारे अधिकारी कोण आहेत? याबाबतचे निकष कुणी ठरविले ? लाभार्थींची नावे आणि त्यांना दिलेल्या अग्रिमाची रक्कम याबाबतची माहिती द्यावी. त्यावर अशी माहिती देण्यात आली की, (१) श्री.वामन हाडे रु.८,८००/- (२) श्री. अविनाश पाटील रु.२,८००/- (३) श्रीमती मैनाबाई बिडवे रु.२,८००/- (४) श्री. जानू ठवळे रु.२,८०० (५) श्री. उत्तम गव्हाळे रु.२,८००/- (६) श्री.अशोक मेश्राम रु.२,८००/- (७) श्री. शेख महमूद रु.१४,४००/- (विहिरीचे काम पूर्ण झाले) (८) श्री.प्रल्हाद इंगळे रु.३,०००/- (९) श्री.रामराव भगत रु.४,५००/- (१०) श्री.महादेव इंगळे रु.४,५००/- (११) श्री.बापू रोकडे रु.४,०००/- (१२) श्रीमती अनुराधा मेतकर रु.४,०००/- (१३) श्री.रमेश झाडेपे रु.४,५००/- (१४) श्रीमती गोदावरी इंगळे रु.४,०००/- (१५) श्री.मनोहर राहने रु.४,०००/- (१६) श्री.वासुदेव मानकर रु.४,०००/- (१७) राजू घोगरे रु.४,५००/- (१८) श्री.रामभाऊ लाखे रु.३,०००/- (१९) श्री.गोकर्णा निळखंट रु.३,०००/- (२०) श्री.विजय थोरात रु.३,०००/- (२१) श्री.महादेव वाघमारे रु.४,५००/- (२२) श्री. शंकर इंगोले रु.४,५००/- (२३) श्री.शिवाजी दाऊ रु.४,५००/- (२४) श्री.बबन वानखेडे रु.४,५००/-.

त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ज्या शाखा अभियंत्यांनी एकाला २,८०० तर दुसऱ्याला ४,५०० आणि तिसऱ्याला ८ हजार रुपये अग्रिमाची रक्कम दिली. आपण नियमाप्रमाणे दहा टक्के रक्कम दिली पाहिजे. परंतु अशाप्रकारे शाखा अभियंत्यांनी मनमानी पध्दतीने अग्रिमाचे वाटप केले

आहे, त्याच्यावर आपण काय कारवाई केली त्यावर असे सांगण्यात आले की, त्या शाखा अभियंत्यांचे नाव आता उपलब्ध नसल्याने ती माहिती घेऊन १५ दिवसात त्याच्यावर करवाई करतो.

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुद्दयांसंदर्भात अधिक माहिती मागविली.

१. सदर प्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यावर निलंबनाची १५ दिवसात कार्यवाही करुन समितीला व शासनाला त्या संदर्भातील अहवाल सादर करण्याबाबत मा. समिती प्रमुखांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली ?

२. नसल्यास त्याची कारणे काय ?

३. सद्यस्थितीपर्यंत संबंधित २३ लाभार्थ्यांकडुन किती रक्कमेची वसुली करण्यात आली व अद्याप किती रक्कम वसुली करणे बाकी आहे ?

४. सदर रक्कम वसुली बाबत काय कार्यवाही करण्यात आली ?

उपरोक्त मुद्दयासंदर्भात जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

रोजगार हमी योजने अंतर्गत जवाहर विहीरी कार्यक्रमात अग्रिम घेऊन काम न करणारे एकुण २४ लाभार्थी आहेत, लघु सिंचन उपविभाग पातुर १२, उप विभाग अकोट ५, उप विभाग अकोला-७ अशा एकुण २४ विहीरी होत्या सदर विहीरी ह्या १९९३-९५ या वित्तीय वर्षातील आहे. २००३-०४ पर्यंत सुद्धा सदर लाभार्थ्यांनी खोदण्याच्या कामासाठी प्रारंभ केला नव्हता. तसेच विहीरींची कामे न केल्यामुळे दिलेल्या अग्रिमाची संबंधित लाभार्थ्यांकडून वसुल करण्यासाठी आवश्यक कार्यवाही केलेली नसल्यामुळे दिनांक २५ ते २७ सप्टेंबर, २००८ रोजी जिल्हा परिषद, अकोला येथे झालेल्या पंचायत राज समितीच्या बैठकीत मा. समिती प्रमुखांनी दिलेल्या निर्देशानुसार अग्रिमाची शिफारस करणारे शाखा अभियंता श्री.एन.व्ही.ठाकरे, श्री.डी.जे.आमले, अब्दुल नसीम, अब्दुल रहीम, ए.जी.वाकोडे, एस.आर.चौधरी यांना दिनांक १४/८/२००९ च्या पत्रानुसार दोन वेतनवाढी दोन वर्षाकरीता का बंद करण्यात येवु नये याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या होत्या त्यानुसार संबंधितांनी स्पष्टीकरण सादर केले आहे.

प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणानुसार विहीरीचे काम सुरु करण्यासाठी लाभार्थ्यांना शासन निर्णय क्र.रोहयो/२१९२(प्र-६६)/रोहोयो-६ दिनांक २४/४/१९९२ नुसार मंजुर रक्कमेच्या १०% रक्कम अग्रिम देणे अनिवार्य आहे त्यानुसार २४ लाभार्थ्यांना अग्रिम देण्यात आला होता २४

विहीरींपैकी शेख महमुद श.हुसेन यांनी विहीर पुर्ण केली आहे. त्यामुळे त्यांचेकडे असलेला अग्रीम रु.१४,४००/- वसुल करण्यात आला नाही. वामन किसन हांडे रा.गोरेगांव यांना शाखा अभियंता श्री.एन.व्ही.ठाकरे यांनी प्रथम अग्रिम २,८००/- रु. दिला या विहीरीचे मुल्यांकन १,९८४/- आले असतांनाही रु.६,०००/- देण्यात आले त्यामुळे संबंधित शाखा अभियंता यांचे कडुन दिला गेलेला रु.६,०००/- १८% व्याजासह रुपये २२,०२०/- वसुल करण्यात आला असुन तो शासन खाती चलान म्हणुन दिलेले रु.२,८००/- वसुली करण्याबाबत आर.आर.सी.प्रस्ताव सादर करण्यात आले आहे. इतर २२ विहीरींना १०% व त्यापेक्षा कमी अग्रिम देण्यात आलेला असल्यामुळे इतर संबंधित शाखा अभियंता यांचेवर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली नाही. मुद्दा क्र.१ चे अनुपालनात नमुद केल्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. सद्यस्थिती संबंधित २३ लाभार्थींपैकी श्री.एन.व्ही.ठाकरे, शाखा अभियंता यांचेकडील लाभार्थींची अग्रीमाची वसुली व्याजासह एकुण रु.२२,०२०/- शाखा अभियंता यांचे कडुन वसुल केलेली आहे. दिलेल्या एकुण १,०५,२००/- अग्रिमापैकी २२,०२०/- व शे.महमुद शे.हुसेन यांची विहीर पुर्ण झाल्यामुळे त्यांना दिलेल्या अग्रिम १४,४००/- वजा जाता व नझुल तहसिलदार जिल्हाधिकारी, अकोला यांचे पत्र क्र.नतह/अका/७५१ दिनांक २१/९/२०१० अन्वये २३ लाभार्थ्यांपैकी श्री.प्रल्हाद पांडुरंग इंगळे यांचेकडुन रु.२,५००/- व श्री.रामराव भगत यांचेकडुन रु.४,५००/- असे एकुण रु.७,०००/-अग्रीम वसुल केले आहे व रु.७७,८००/- ची वसुली बाकी आहे. सदर रक्कम वसुलीबाबत दिलेल्या अग्रिमाच्या रक्कमा वसुल करण्यासाठी शासन निर्णयानुसार १८% व्याज दराने महसुली वसुलीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अकोला यांचेकडे या कार्यालयाचे पत्र क्र. ८९५/ दिनांक २४/४/२००७, पत्र क्र.१३९२ दि.६/९/२००८, पत्र क्र.१६४० दि.१६/१०/२००८, पत्र क्र.१०० दि.१६/१/२०१० व पत्र क्रमांक ११५३ दिनांक २५/८/२०१० आणि पत्र क्रमांक १२३० दिनांक १८/९/२०१० नुसार पाठपुरावा केला आहे. तसेच प्रत्यक्ष चर्चा करुनही याबाबत मा. जिल्हाधिकारी यांना या प्रकरणामध्ये व्यक्तीशः लक्ष घालण्याची विनंती केलेली आहे.

सचिवांची साक्ष :-

उपरोक्त माहितीच्या अनुषगांने समितीने दि. ६ ऑक्टोबर, २०१० रोजी संबंधित विभागाची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, १५ दिवसात कारवाई करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. याबाबत प्रत्यक्षात कोणती कारवाई झालेली आहे त्यावर असे सांगण्यात आले

की, रोजगार हमी योजने अंतर्गत जवाहर विहिरी कार्यक्रमात अग्रिम घेऊन काम करणारे एकूण २४ लाभार्थी आहेत. यात दोन भाग आहेत. एक म्हणजे शेतक-यांना कामास प्रारंभ केलेला नाही. दुसरे म्हणजे हे काम शेतक-यांनी पूर्ण न केल्याबद्दल अधिकरी देखील तितकेच जबाबदार आहेत. मंजुर रक्कमेच्या १० टक्के रक्कम अग्रिम म्हणून लाभार्थीला देण्यात येते. २४ पैकी एका लाभार्थ्याने विहिरी पूर्ण केलेली आहे, त्यामुळे त्याच्याकडून अग्रीम वसूल केलेला नाही. दुस-या लाभार्थीला प्रथम रक्कम रु.२,८००/- इतका अग्रिम दिला होता. त्याच्या विहिरीचे मूल्यांकन रुपये १,९८४/-आले असताना देखील रुपये ६,०००/- देण्यात आले होते. त्यामुळे १८ टक्के व्याजासहित रक्कम संबंधित अभियंताकडून वसूल करण्यात आली आहे. तसेच संबंधित असणाऱ्या शाखा अभियंत्यांना दोन वेतनवाढी दोन वर्षाकरिता बंद करण्यात का येऊ नये याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या होत्या.

समितीपुढे असे मत व्यक्त केले की, अग्रिम घेऊन शेतक-यांनी काम केले नसेल तर कारवाई झाली पाहिजे व पुढे अशी विचारणा केली की, अधिका-यांनी काय स्पष्टीकरण दिलेले आहे? त्यावर असा खुलासा करण्यात आला की, २३ लाभार्थी पैकी श्री. ठाकरे, शाखा अभियंता यांच्याकडील लाभार्थीची अग्रिमाची वसुली व्याजासह करण्यात आलेली आहे. रुपये १,०५,२००/- अग्रिमापैकी रुपये २२,०२०/- व लाभार्थी शेख मेहमुद शेख हुसेन यांची विहीर पूर्ण झाल्यामुळे दिलेला अग्रिम रुपये १४,४००/- वजा जाता तसेच २३ लाभार्थ्यांपैकी श्री. प्रल्हाद इंगळे यांच्याकडून रुपये २,५००/- व श्री. रामराव भगत यांच्याकडून रुपये ४,५००/- असे एकूण रुपये ७,०००/- अग्रिम वसूल केले आहे. त्यामुळे आता रुपये ७७,८००/- ची वसुली होणे बाकी आहे. वसुलीबाबत आम्ही लाभार्थींना नोटीस पाठविली आहे. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, रक्कम रुपये ७७,८००/- वसुली होणे बाकी आहे. समितीने साक्ष घेण्याचे निश्चित केल्यानंतर आपण संबंधितांना वसुली संबंधातील पत्र पाठविली आहेत. त्यावर सचिवांनी असे सांगितले की, शेतक-यांनी काम करणे अपेक्षित आहे. ४-५ नोटीसा देऊन काहीही करत नसतील तर जिल्हाधिका-याच्या मार्फत नोटीसा देऊन वसुली केलेली आहे.

<u>अभिप्राय व शिफारशी :</u>

समितीला प्राप्त झालेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, सन १९९३-९५ या कालावधीतीत रोजगार हमी योजनेंतर्गत विहिरीची कामे करण्यासाठी लाभार्थींना अग्रीम देण्यात आला होता परंतु २४ लाभार्थींनी विहीरीच्या कामास सुरुवात केलेली नव्हती. शासन निर्णयानुसार अग्रीमाची रक्कम घेवून देखील विहरीची कामे ज्या लाभार्थींनी सुरु केली नाहीत त्यांच्याकडून अग्रीमाची रक्कम व्याजासह वसुल

करणे आवश्यक होते परंतु जिल्हा परिषदेमार्फत अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. लेखा आक्षेपात ज्यावेळी सदर बाब निदर्शनास आली तेव्हा अशा लाभार्थींच्यावर सन २००५ मध्ये आरआरसीची कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात कळविण्यता आले. परंतु त्याबाबतचा पाठपुरावामात्र करण्यात आल्याचे दिसून आले नाही. **समितीने जेव्हा जिल्हापरिषदेला भेट देवून सदर मुद्दयाच्या अनुषंगाने सचिवांची साक्ष घेतली तेव्हा २३ लाभार्थांना देण्यात आलेल्या एकूण रक्कमेपैकी थोडया रक्कमेची वसुली झाली असून उर्वरीत रक्क्म रुपये ७७,८००/- ची वसुली होणे अद्यापपर्यंत बाकी आहे. यावरुन वसुलीची कार्यवाही फारच संथ गतीने होताना दिसून आली यावरून सदर मुद्याचा पाठपुरावा समितीने केला नसता तर वसुली संदर्भातील कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली नसती असा समितीला प्राप्त झालेल्या माहितीवरुन निष्कर्ष काढल्यास वावगे ठरु नये.**

सन १९९३ ते ९५ या अर्थिक वर्षात जवाहर विहीरीसाठी लाभार्थ्यांना अग्रीम देण्यात आला होता परंतु त्यापैकी २४ लाभार्थ्यांना अग्रीमाची रक्कम घेवूनही विहीरी खोदण्याच्या कामास सुरुवात केलेली नव्हती अशा लाभार्थीकडून संबंधित अधिकाऱ्यांनी अग्रीमाची दिलेल्या रक्कमेची वसुलीची कार्यवाही त्याचवेळी सुरु करणे अपेक्षित होते परंतु तशा प्रकारची कारवाई त्यांनी केली नाही व आता विलंबाने वसुलीची कारवाई सुरु केली आहे याबाबत समितीला आश्चर्य वाटते. तसेच यासाठी संबंधित शाखा अभियंता जेवढे जबाबदार आहेत तेवढेच त्यांचे वरिष्ठ अधिकारी देखील जबाबदार आहेत. वरिष्ठांना जर या बाबीचा आढावा घेतला असता तर संबंधितांवर कारवाई करण्यास ऐवढा विलंब झाला नसता. सबब, समितीने दिलेल्या निदेशानुसार जिल्हा परिषदेमार्फत प्रस्तावित करण्यात आलेली उर्वरीत रक्कमेच्या वसुली संदर्भात योग्य ते प्रयत्न तातडीने करावेत व त्यासंदर्भातील कारवाई पूर्ण होताच त्याबाबतची माहिती समितीला लवकरात लवकर पाठविण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.

१.२ एकाच कामाची अनेक तुकडयात विभागणी करुन वरिष्ठ स्तरावरील प्रशासकीय मंजुरी टाळणे बाबतः- (परिच्छेद क्र. ३.१३१)

सन २००३-२००४ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्रमांक-३) जिल्हा परिषद अकोला यांनी एकाच कामाची अनेक तुकड्यात विभागणी करुन वरीष्ठ स्तरावरील प्रशासकीय मंजूरी टाळणे याबाबत लेखापरिक्षकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

शासन परिपत्रक ग्रामविकास विभाग क्र.झेडपीए-१०८९/प्र.क्र.- ३३ दि. ८ फेब्रुवारी, १९९० नुसार तसेच महाराष्ट्र बांधकाम लेखा संहिता, महाराष्ट्र जिल्हा परिषद, व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियमाप्रमाणे कामाची विभागणी करुन तुकडे पाडुन कामे देण्यास बंदी असतांना वरिष्ठ स्तरावरील प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी तसेच विहीत पध्दती टाळण्यासाठी उप अभियंता, बाळापुर यांनी रु.६ ते ७ लाख रक्कमेच्या कामाची विभागणी करुन अ-१ निवीदेवर स्वतःच्या मंजुरीने कामे दिली आहेत. त्यामध्ये एकाच कंत्राटदारास दोन ते तीन लाखापर्यंतची कामे एकाच वेळी देण्यात आली आहेत. करारनामा करतांना निविदेसोबत आवश्यक प्रमाणपत्रे घेण्यात आलेली नाहीत. व विद्युत नुतणीकरण व दुरुस्तीचे अ-१ करारनामे अपुर्ण आहेत. उर्वरित प्रमाणपत्रे व मोजमाप नोंदवह्या लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आले नाहीत. सदर प्रकरणी उप अभियंता यांचा खुलासा प्राप्त करणे आवश्यक आहे. कार्यकारी अभियंता यांनी तुकडे पाडलेल्या कामांची बिले कशाच्या आधारे मंजुर केली याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हापरिषद, अकोला यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला.

शासन परिपत्रक दिनांक ८ फेब्रुवारी, १९९० अन्वये एका कामाचे तुकडे पाडून काम करता येत नसतांना तत्कालीन उप अभियंता, उपविभाग बाळापूर यांनी एका कामाची विभागणी करुन तुकडे पाडून अ-१ करारनामे केलेले आहेत. सद्यस्थितीत तत्कालीन उप अभियंता बाळापूर श्री.महावीर हे मयत झाले असून सदर कामाचे तुकडे पाडलेल्या देयकांना मंजूरी देणारे तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री.मुनिर शहा हे दिनांक ३१/५/२००४ ला सेवानिवृत्त झालेले आहेत. परंतु संबंधित अनियमितेबाबत त्यांना या कार्यालयाचे पत्र क्र./१३५३/दिनांक २८/८/२००८ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यांत आली असून संबंधितांचा उलटसुलट खुलासा मागविण्यांत आलेला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी महितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला यांची दिनांक २५ सप्टेंबर, २००८ रोजी साक्ष घेतली. एकाच कामाची अनेक तुकडयात विभागणी करुन वरिष्ठ स्तरावरील प्रशासकीय मंजुरी टाळणे यासंदर्भातील खुलाशात अनियमिततेबाबत संबंधितांना

दिनांक २८/८/२००८ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. यावरून सदर प्रकरणी चार वर्षे कारवाई केली नाही असे दिसून येते व आता समिती येणार म्हणून दिनांक २८/८/२००८ ला कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे असे मत व्यक्त करून अशी विचारणा केली की, तत्कालीन उप अभियंता, बाळापूर श्री.महावीर हे मयत झालेले आहेत आणि तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री.मुनिर शहा हे सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांचे पेन्शन सुरु झालेले आहे काय, त्यावर असे सांगण्यात आले की, महावीर यांची तात्पुरती पेन्शन मंजूर झाली आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, पेन्शन मंजुर करण्यासाठी एनओसी देणारे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी कोण होते व त्यांच्या निदर्शनास सदर बाब आणण्यात आली होती का, त्यावर श्री.पोखरकर हे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी होते तसेच सदर प्रकरणी बांधकाम समितीची कार्योत्तर मंजूरी घेतली होती असे सांगण्यात आले. त्यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, या कामास बांधकाम समितीची कायोर्त्तर मंजुरी घेतलेली असेल तर मग कोणती अनियमितता राहिलेली आहे. त्यावर असे सांगण्यात आले की, नियमानुसार तुकडे पाडून कामे करता येत नाहीत. त्याबाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कॅफो त्यांच्याकडे नस्ती पाठवून अशा कामास मंजुरी घ्यावी लागते. परंतु सदर प्रकरणी त्यांच्याकडे नस्ती पाठविण्यात आलेली नव्हती.

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुद्दयासंदर्भात अधिक माहिती मागविली.

(१) एकाच कामाचे तुकडे पाडून काम करण्यावर शासनाचे निर्बंध असताना श्री.मुनिर शहा, तत्कालिन कार्यकारी अभियंता यांच्याकडून उलट टपाली खुलासा मागवून घेण्यात आला आहे काय,

(२) असल्यास त्यांच्या खुलाशात काय म्हटले आहे.

(३) सदर खुलाशातील माहिती त्यांना दिलेल्या कारणे दाखवा नोटीसीच्या अनुषंगाने समाधानकारक आहे काय, असल्यास कशी ?

(४) नसल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली ? नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

उपरोक्त मुद्दयासंदर्भांत जिल्हा परिषद अकोलाकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

(१) एकाच कामाचे तुकडे पाडून काम करण्यावर शासनाचे निर्बंध असतांना श्री.मुनिर शहा तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी एकाच कामाचे तुकडे पाडून केलेल्या कामांना दिलेल्या मंजूरीबाबत त्यांचेकडून विभागाचे पत्र क्र/१३५३/०८ दिनांक २८/८/२००८ अन्वये खुलासा मागविण्यांत आला परंतू त्यांचेकडून खुलासा प्राप्त न झाल्यामुळे पुनश्च विभगाचे पत्र क्र./१४७५/०८ दिनांक ८-९-२००८ अन्वये सदर प्रकरणी त्यांचा खुलासा मागविण्यांत आला परंतू त्यांचेकडून खुलासा प्राप्त झालेला नाही त्यांना पुन्हा विभागाचे पत्र क्र./५५२/१० दिनांक १५/५/२०१० अन्वये खुलासा मागविण्यांत आला परंतू तो देखिल प्राप्त न झाल्यामुळे अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अकोला यांचे पत्र क्र./१८५९/१० दिनांक २-८-२०१० अन्वये अंतिम पत्र देवून श्री. मुनिर शहा यांचा खुलासा मागविण्यांत आलेला असून अदयाप पर्यंन्त संबंधितांचा खुलासा अप्राप्त आहे.

(२) श्री.मुनिर शहा तत्कालीन का.अ.बांधकाम यांचा खुलासा अप्राप्त आहे.

(३) संबंधिताचा खुलासा अप्राप्त आहे.

(४) श्री.मुनिर शहा यांचा सदर प्रकरणी खुलासा अप्राप्त असल्यामुळे त्यांना अति.मु.का.अ.जि.प. अकोला यांचे पत्र क्र/१८५९/१० दिनांक २-८-२०१० अन्वये दिलेल्या पत्रामध्ये ७ दिवसांचा कालावधी देण्यात आला होता परंतू त्यांचेकडून अद्याप खुलासा प्राप्त न झाल्यामुळे व त्यांना सेवानिवृत्त होवून ६ वर्षाचा कालावधी पूर्ण झाला असून अन्य प्रकरणी त्यांचे सेवानिवृत्ती विषयक लाभ पूर्णपणे प्रदान करण्यांत आलेले नाहीत. त्यांचेवर शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याचा प्रस्ताव अवर सचिव, महा.शासन सार्वजनिक बांधकाम विभाग सेवा -६ मंत्रालय, मुंबई यांचेकडे कार्यालयाचे पत्र क्र.२५८४/१० दिनांक १७/९/२०१० अन्वये सादर करण्यात आलेला आहे.

सचिवांची साक्ष :-

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ६ ऑक्टोबर, २०१० रोजी संबंधित विभागाची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने प्राप्त झालेल्या माहितीचे अवलोकन केल्यानंतर असे मत व्यक्त केले की, एकाच कामाचे तुकडे पाडून काम करण्यावर शासनाचे निर्बंध असताना कामाचे तुकडे पाडून कामे करण्यात आली म्हणून श्री.मुनीर शहा, तत्कालीन कार्यकारी अभियंता यांच्याकडून उलट टपाली खुलासा मागवून घेण्यात आला आहे काय असा प्रश्न दिनांक २९.९.२००८ रोजी समितीने जेव्हा

अकोला जिल्हा परिषदेस भेट दिली होती त्यावेळी विचारण्यात आला होता. परंतु आता साक्षीच्या वेळी देखील श्री.मुनीर शहा यांच्याकडून अद्यापी खुलासा प्राप्त झालेला नाही असा खुलासा करण्यात आला आहे. यावरुन अधिकारी समितीला कमी लेखतात हे कितपत योग्य आहे. त्यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी असा खुलासा केला की, श्री.मुनीर शहा हे २००४ मध्ये सेवानिवृत्त झाले असून त्यांना सेवानिवृत्त होऊन सहा वर्षे झाली आहेत. खरे म्हणजे चार वर्षाच्या आत त्यांच्यावर कारवाई करावयास पाहिजे होती. परंतु, नियमानुसार चार वर्षानंतर कारवाई होऊ शकत नाही. दुसरे श्री.महावीर, उप अभियंता हे मयत झाले आहेत. एकूण ११.५० लाख रुपयांची ३३ कामे होती. उप अभियंत्यांना ५० हजार रुपयांपर्यंतच्या कामांचे अधिकार असतात. परंतु उप अभियंत्यानी एक लाख रुपयांची चार कामे केली म्हणून त्यांच्यावर ॲक्शन घेणे आवश्यक होते. श्री.मुनीर शहा यांना सेवा निवृत्त होऊन चार वर्षे झाल्यामुळे त्यांचेकडे मागितलेला खुलासा त्यांनी दिला नाही. ते सेवानिवृत्त झाले असल्यामुळे त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करु शकत नाही. या प्रकरणात फ्रॉड झालेला नाही. प्रशासकीय दृष्ट्या केलेली चूक होती.

त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिल्यानंतर त्यांच्याविरुध्द कारवाई झाली पाहिजे. सन २००८ मध्ये कारवाई करण्यास सांगितले असताना आता २०१० मध्ये देखील कारवाई होत नाही हे योग्य नाही. तसेच येथून पुढे समितीने केलेल्या शिफारशी वा एखाद्या अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करण्यास सांगितल्यानंतर त्याबाबत सविस्तर अभ्यास करुन अधिकाऱ्यांनी समिती पुढे साक्षीला यावे, असे निदेश देवून पुढील बैठकीच्या वेळी संपूर्ण माहितीसह उपस्थित व्हावे असे निदेश दिले.

समितीने सदर मुद्यासंदर्भात पुन्हा दिनांक ६ ऑक्टोबर, २०१० रोजी सचिवांची साक्ष घेतली असता विभागाच्या सचिवांनी असा खुलासा केला की, श्री.मुनीर शहा यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याच्या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दिनांक १७.९.२०१० ला प्रस्ताव पाठविला आहे. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागानेदिनांक ५ ऑक्टोबर, २०१० ला जिल्हा परिषदेला पुन्हा पत्र पाठवून महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती नियम १९८२ मधील तरतुदीनुसार संबंधित अधिकारी सेवानिवृत्त होऊन चार वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्यामुळे त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई सुरु करता येईल की कसे याबाबत अभिप्राय मागितले होते. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिनांक २५.१०.२०१० च्या पत्रान्वये श्री.मुनीर शहा यांच्याविरुध्द नियमानुसार कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव

मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे असा प्रस्ताव सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांना पाठविला आहे.

त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, या अनियमिततेला केवळ कार्यकारी अभियंता जबाबदार नाहीत तर अकाऊंट ऑफिस, कॅफो कार्यालय, डेप्युटी इंजिनियर आणि टेक्निकल विभागाची सर्व टीम जबाबदार असणार असे असताना केवळ कार्यकारी अभियंता सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांच्याविरुध्द काही कारवाई करु शकत नाही असे म्हणता येणार नाही. तर मुळामध्ये या अनियमिततेला पूर्ण टेक्निकल टीम जबाबदार होती. वर्क ऑर्डरवर ज्यांनी सह्या केल्या, ज्यांनी या कामाला टेक्निकल सॅक्शन दिले, ज्यांनी या कामाचे अकाऊंटिंग केले त्या सर्व अधिकाऱ्यांची यादी आपण आणली आहे काय ? केवळ कार्यकारी अभियंत्यांना हे काम घेता येणार नाही.

त्यावर असा खुलासा करण्यात आला की, ३३ कामे त्यांनी केलेली आहेत. त्यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छता जिल्हा परिषद योजनेमध्ये या जिल्हा परिषदेने भाग घेतला होता. त्या अनुषंगाने वेगवेगळ्या कार्यालयांची, पदाधिकाऱ्यांच्या क्वार्टर्सची रंगरंगोटी व दुरुस्तीची अशी एकूण २३ ठिकाणची कामे आहेत. कार्यकारी अभियंत्यांना अडीच लाख रुपयापर्यंतची कामे घेण्याचा अधिकार आहे. एकाच कामाचे तुकडे पाडून कामे देण्यात आली असे नाही. यामध्ये शासकीय निधीमधून १४ कामे घेतलेली आहेत. जिल्हा परिषदेच्या सिव्हिलची ६,९८,०४१ रुपयाची १९ कामे आहेत. यासंदर्भात मुख्य लेखा वित्त अधिकाऱ्याबरोबर चर्चा झालेली आहे. वेगवेगळ्या ठिकाणची ही कामे आहेत. त्यामध्ये सहा पदाधिकाऱ्यांच्या क्वार्टर्सची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. अशा पध्दतीने रंगरंगोटी करुन त्या जिल्हा परिषदेने त्या योजनेमध्ये भाग घेतला आणि त्या जिल्हा परिषदेला बक्षिसही मिळाले. संबंधित कार्यकारी अभियंता सेवानिवृत्त झालेले असून उप अभियंता मयत झालेले आहेत. जिल्हा परिषदेने वेळोवेळी पत्र व्यवहार करुन कार्यकारी अभियंत्याकडून खुलासा मागविल्यानंतरही त्यांनी खुलासा दिलेला नाही. त्या वेळेला नेमके काय घडले याच्या खोलात गेल्यानंतर असे लक्षात आले की, जी कामे झालेली आहेत ती जिल्हा परिषदेतील रंगरंगोटी करण्याची २३ ठिकाणची कामे होती.

त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ही २३ ठिकाणची कामे होती तर मग आपण हे एक काम होते असे सर्टिफाय कसे केले आणि संबंधितावर कारवाई करण्याच्या संदर्भात आपण वेळोवेळी सादर कसे केले ? एका कामाचे वेगवेगळे भाग न करता ती कामे वेगवेगळी होती अशा पध्दतीचा खुलासा अगोदर केला असता तर संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता.

ही कामे वेगवेगळी होती असा आता या ठिकाणी खुलासा करण्यात येत आहे. त्यामुळे या कामाच्या संदर्भात यापूर्वी आलेला खुलासा योग्य नव्हता काय ? जर ही कामे विखुरलेली होती तर त्या विखुरलेल्या कामांच्या संदर्भात आपल्याला माहिती देता येईल काय ?

त्यावर मुख्य लेखा अधिकारी, वित्त यांनी असा खुलासा केला की, ही सर्व कामे उप विभागीय स्तरावर मंजूर झालेली आहेत. डिविजन लेव्हलवर एकही काम मंजूर झालेले नाही. उप अभियंता मयत झालेले आहेत. या प्रकरणाच्या संदर्भातील संपूर्ण माहिती शाखा अभियंत्याकडून घेतलेली आहे. दिनांक ३० व ३१ जानेवारीला ग्रामविकास मंत्र्यांनी औरंगाबाद येथे एक बैठक घेतली होती. सदर बैठकीमध्ये स्वच्छता अभियान राबविण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार आयुक्तांनी या स्वच्छता अभियानात सर्व जिल्हा परिषदांनी सहभागी व्हावे अशा प्रकारचे परिपत्रक काढले होते. त्याप्रमाणे या योजनेत या जिल्हा परिषदेने आपला सहभाग नोंदविला. या जिल्हा परिषदेला तीन लाख रुपयाचे पहिले पारितोषिक मिळालेले आहे. एकूण ३३ कामे होती त्यापैकी ४ कामे फेब्रुवारीमध्ये झ ालेली आहेत. पण या इमारती वेगवेगळ्या आहेत. वेगवेगळ्या कार्यालयाची व क्वार्टर्सची दुरुस्ती अशा प्रकारची वेगवेगळी कामे आहेत. चौकशी नंतर कार्यकारी अभियंत्यांनी यासंबंधीचे देयक मंजूर केले आहे.

लेखा परीक्षकांनी कार्यकारी अभियंत्याकडून खुलासा मागविण्यात यावा असे म्हटले होते त्याप्रमाणे त्यांच्याकडून खुलासा मागविला होता.

त्यावर समितीने यामध्ये अनियमितता झाली नाही काय ? अशी विचारणा केली असता सदर कामात अनियमितता झाली नसल्याचे सांगण्यात आले.

त्यावर समितीने अशी विचारणा केली की, याबाबत अनुपालन अहवालात असे म्हटले आहे की, "एकाच कामाचे तुकडे पाडून काम करण्यावर शासनाचे निर्बंध असताना श्री.मुनीर शहा तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी एकाच कामाचे तुकडे पाडून केलेल्या कामांना दिलेल्या मंजुरीबाबत त्यांचेकडून खुलासा मागविण्यात आला परंतु त्यांच्याकडून खुलासा प्राप्त न झाल्यामुळे त्यांना पुन्हा पुन्हा पत्र पाठवूनही अद्यापपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही." जर अनियमितता झाली नाही तर खुलासा कसा मागविला ही फुटकळ कामे होती. मग या ठिकाणी अशा पध्दतीचा खुलासा पाठविण्याची आवश्यकता नव्हती. ही कामे जी.आर. मध्ये बसत नव्हती, ही कामे फुटकळ होती त्यामुळे विभागीय स्तरावर या कामांना मंजुरी देऊन ती पूर्ण करण्यात आली असा खुलासा आपण दिला

असता तर ते योग्य झाले असते. त्यांच्याकडून जर सात दिवसात खुलासा मागितला असेल तर त्यांनी सात दिवसात खुलासा सादर केला काय आणि कोणत्या पध्दतीचा खुलासा सादर केला हा आमचा विषय नाही. पण त्या अधिकाऱ्याने त्यांचे स्पष्टीकरण द्यावयास पाहिजे होते.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, खुलासा सादर केला नाही त्याबाबत काय कारवाई केली त्यावर असे सांगण्यात आले की, त्याबाबत बांधकाम विभागाला कळविले. त्यांनी सामान्य प्रशासन विभागाकडे काही दिवसांपूर्वी प्रस्ताव पाठविला आहे. त्यावर समितीने असे निदेश दिले की, ही ३३ कामे कोणती आहेत याची सविस्तर माहिती समितीला पाठवावी. एका कामाचे तुकडे पाडून कामे दिली नसतील तर तशी माहिती समितीला पाठवावी.

अभिप्राय व शिफारशी :-

एकाच कामची अनेक तुकड्यांत विभागणी करून वरिष्ठ स्तरावरील प्रशासकीय मंजूरी टाळण्याबाबत या मुद्यासंदर्भात प्राप्त झालेल्या माहितीवरून असे दिसन येते की, जि.प.अकोलाअंतर्गत तत्कालीन कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी शासन परिपत्रक दिनांक ८ फेब्रुवारी, १९९० व महाराष्ट्र बांधकाम लेखा संहिता तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील तरतूदी अन्वये कामाची विभागणी करून त्याचे तुकडे पाडून काम देण्यास बंधी असताना देखील कामे करण्यात आली. तसेच, सदर कामाची आवश्यक कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाहीत. इत्यादी संदर्भात लेखापरीक्षकांनी आक्षेप घेतल्यानंतर संबंधितांकडून खुलासा मागविण्यात आला परंतु त्यांच्याकडून अद्यापर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. सदर प्रकरणातील संबंधितांपैकी उप अभियंत्याचे निधन झाल्याचे तर कार्यकारी अभियंता हे निवृत्त होवून सहा वर्षाचा कालावधी लोटला असल्याचे निदर्शनास आले. समितीने जिल्हा परिषद भेटीच्यावेळी संबंधितांनी कामाचे तुकडे पाडून काम केल्यासंदर्भात खुलासा विचारण्यात आलेला होता. परंतु, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१० रोजी सचिवांची साक्ष जेव्हा घेण्यात आली त्यावेळेपर्यंत देखील त्यांच्याकडून खुलासाप्राप्त झालेला नव्हता याबद्दल समितीने तीव्र नाराजी व्यक्त करून संपूर्ण माहितीसह समितीसमोर येणाऱ्या सूचना समितीने केल्यानूसार पुन्हा एकदा समितीने साक्ष घेतली त्यावेळी अशी माहिती समितीसमोर आली की, जिल्हा परिषद, अकोलाने त्यावेळी स्वच्छता अभियानात भाग घेतला होता व या योजनेअंतर्गत क्वार्टर्सची तसेच वेगवेगळ्या कार्यालयाची दुरुस्ती व रंगरंगोटीची वेगवेगळी कामे करण्यात आलेली आहेत.

समितीला एकूण प्राप्त झालेल्या माहितीवरून असे निदर्शनास आले की, एकाच कामाचे तुकडे पाडून कामे करण्यात आल्याबाबतचा आक्षेप लेखापरीक्षकांनी त्यांच्या सन २००३-२००४ च्या लेखा आक्षेपात घेतला होता व त्या अनुषंगाने जिल्हा परिषद, अकोलाने तत्कालीन संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देणे आवश्यक होते. परंतु, सदर नोटीस समितीने भेट देण्यापूर्वी दिल्याचे दिसून आले. वास्तविक पाहता सदर प्रकरणातील संबंधितांवर ही कारवाई सदर मुद्दा ज्यावेळी लेखापरीक्षणात आला त्याचवेळी करणे अपेक्षित होते. परंतु, त्यांना कारणे दाखवा नोटीस ही दिनांक २८ ऑगस्ट, २००८ रोजी देण्यात आली व त्यावेळी तत्कालीन संबंधित अधिकाऱ्यांपैकी एकाचे निधन झाले होते व दुसरे सन २००४ मध्ये निवृत्त झाले होते. यावरून जिल्हा परिषद प्रशासन हे लेखाआक्षेपाच्या पूर्ततेच्या संदर्भात फारच संथगतीने कार्यवाही करीत आहे असे दिसून येते. संबंधित अधिकारी सेवेत असतानाच त्यांच्याकडून सदर आक्षेपासंदर्भातील खुलासा त्यांच्याकडून जिल्हा परिषदेनेला मिळवता आला असता परंतु जिल्हा परिषदेच्या अशा संथपणामुळे सदर मुद्यासंदर्भातील वस्तुस्थिती उघड होण्यासाठी सचिवांच्या साक्षी घ्यावी लागली व सदर साक्षीदरम्यान सदर कामे ही वेगवेगळी असल्याचे उघड झाले. सबब, जिल्हा परिषदेने सदर प्रकरणी वेळीच कारवाई केली असती तर त्यासंदर्भातील वस्तुस्थिती त्याचवेळी निदर्शनास आली असती परंतु जिल्हा परिषदेने सदर प्रकरणी नोटीस देण्याची कारवाई ही समितीने भेट निश्चित करण्यात आल्यावर देण्यात आल्याचे दिसून येते वास्तविक पाहता सदर प्रकरणी लेखाआक्षेप घेण्यात आल्यानंतर लगेचच करण्याची आवश्यकता होती परंतु तसे करण्यात आले नाही यावरुन लेखापरीक्षणातील लेखाआक्षेपांची जिल्हा परिषद प्रशासन गांभिर्याने दखल घेत नाही असे दिसून येते.

लेखाआक्षेपा संदर्भात जिल्हा परिषदेमार्फत अशाच प्रकारचा प्रतिसाद मिळत गेल्यास भविष्यात अशा प्रकारची प्रवृत्ती बळावत जावून समितीपुढे जेव्हा प्रकरण येईल त्यावेळी त्यात लक्ष घालणे आवश्यक आहे अशी भावना जिल्हा परिषद प्रशासनात दृढ होईल. ही बाब निकोप प्रशासनाच्या दृष्टीने भुषणावह नाही. त्यामुळे सदर मुद्याच्या अनुषंगाने **समिती पुन्हा एखदा अशी शिफारस करीत आहे की, मुख्य लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षा पुनविर्लोकन अहवालात नोंदविलेल्या आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदांनी तात्काळ दखल घ्यावी व आवश्यक ती कार्यवाही व जरुरी असेल तेथे सबंधितांवर कारवाई करावी जेणे करून शुल्लक असणारे मुद्दे समितीसमोर येणार नाहीत व समितीचा बहुमूल्य वेळ वाया जाणार नाही. तसेच, सदर आक्षेपात नमुद करण्यात आलेल्या कामांची सविस्तर माहिती देखील समितीला लवकरात लवकर पाठविण्यात यवी.**

प्रकरण दोन

वाशिम जिल्हा परिषद

२.१ विशेष घटक योजनेअंतर्गत अनुसूचित जातीच्या / नवबौद्ध लाभर्थ्यांकडील पशुधनांना जंतनाशके व क्षार मिश्रणे पुरविण्याबाबत. (परिच्छेद क्रमांक ३.४०६)

सन २००३-२००४ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्र.३.४०६) जिल्हा परिषद, वाशिम यांनी विशेष घटक योजनेंतर्गत पशुधनांना जंतनाशके व क्षार मिश्रणे पुरविण्याबाबत प्रमाणक क्र.२८८० दिनांक ३१ मार्च २००४ अन्वये मागासवर्गीयांच्या पशुधनांना जंतनाशके व क्षार मिश्रणे पुरविण्यात येवून रक्कम रु. ९,२२,६८४/- एवढा खर्च करण्यात आला आहे. त्यावर लेखा परिक्षकांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

१. सदरचा पुरवठा दिनांक ३१ मार्च, २००४ अन्वये खरेदी करुन त्याच दिवशी वाटप करण्यात आल्याचे दर्शविले आहे. लाभार्थ्यांना त्याच दिवशी वाटप होणे शक्य नसल्याने त्याच वर्षी योजनेचा लाभ मिळालेला नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा.

२. विभागाच्या साठा नोंदवही नुसार दिनांक ३१ मार्च, २००४ रोजी औषधे प्राप्त करुन त्याच दिवशी पंचायत समितीना वाटप कसे करण्यात आले या बाबत खुलासा करण्यात यावा.

३. पंचायत समिती रिसोड यांचे कडील साठानोंद वहीत बॅच क्र. व्हि १९४०१५ अन्वये औषधांची कालबाह्य तारीख दिनांक २८ फेब्रुवारी, २००६ असतांना ती साठा नोंद वहीत २००४-२००५ कशी नोंद केली याबाबत खुलासा करण्यात यावा.

४. पंचायत समिती रिसोड यांनी त्यांच्या कडील जंतनाशके दिनांक ३१/३/२००४ रोजी वाटप केल्याचे दाखविले परंतु सर्व दवाखान्यांच्या साठा नोंद वहीमध्ये दि.२८/८/२००४ रोजी औषधे प्राप्त झाल्याचे नोंदविले आहे. या तफावती बाबत खुलासा करण्यात यावा.

५. पंचायत समितीने पशुवैद्यकिय दवाखाना चिखली जंतनाशके १६ नग (पॅक) वाटप केले असून दवाखान्यातील नोंदी नुसार १२ नग (पॅक) प्राप्त झाल्याचे नमुद केले आहे. कमी मिळालेल्या नगाची किंमत रुपये १६०० (४x४००) संबंधीताकडून वसुल करण्यात यावेत.

६. पशुवैद्यकीय दवाखाना मेडशी यांना १ नग कमी मिळालेला आहे. या जंतनाशकाची किंमत रुपये ४०० संबंधीतांकडून वसुल करण्यात यावी दवाखाना मेडशी यांनी औषध वाटप केलेली नाही

त्यामुळे लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळालेला नाही. तरी कार्यवाही करुन खुलासा करण्यात यावा.

७. पशुवैद्यकीय दवाखाना तांदळी यांना क्षार मिश्रण १ नग कमी मिळाले आहे. या नगाची किंमत रु. ९१९ (१x९१९) वसुल करण्यात यावे.

८. पांगराबंदी, उकळी पेन, केकतउमरा, करंजी नागठाणा, रिसोड, वारा जहांगीर, कळंबा, कामरगांव, उंबर्डा बा. व शहा येथील पशु दवाखान्यांनी लाभार्थ्यांना जंतूनाशके व क्षार मिश्रणाचा लाभार्थ्यांना वाटप केलेला नाही. याबाबत जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही होणे आवश्यक आहे.

९. उपकेंद्र वारला यांची साठा नोंदवही तपासणीस उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे औषधाबाबत पडताळणी करता आली नाही.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद वाशिम यांच्याकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला.

१. सदरचा पुरवठा दि. ३१/३/२००४ रोजी झाला आहे. ही बाब बरोबर आहे. परंतू लाभार्थींना लाभ पुढील आर्थिक वर्षात देण्यात आला आहे लाभार्थी लाभापासून वंचित झालेला नाहीत.

२. दि.३१.३.२००४ रोजी औषधे प्राप्त झाली आणि त्याच दिवशी औषधे वाटप झाल्याची नोंद साठा नोंदवहीत आहे. ही बाब खरी आहे. तरी याबाबत तालुका पशुधन विकास अधिकारी (वि.) तसेच तत्कालीन नस्ती धारक यांचे कडून खुलासा मागविण्यात येत आहे. तसेच पं.स.स्तरावर दुरध्वनीद्वारे माल नेण्याबाबत सूचना केलेल्या होत्या.

३. या संदर्भात रिसोड पं.स.चे तत्कालीन पशुधन विकास अधिकारी (वि.) यांचे कडून चुकीच्या नोंदी बाबत खुलासा मागविण्यात येत आहे. सर्व कर्मचाऱ्यांना या कार्यालयाचे पत्र क्र. ६५९/२००८ दि. २५/८/२००८ अन्वये करणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

४. रिसोड पं.स. अधिकाऱ्यांनी दि. ३१.३.२००४ रोजी वाटप कसे करण्यात आले याबाबत सर्व कर्मचाऱ्यांना या कार्यालयाचे पत्र क्र. ६५९/२००८ दि.२५/८/२००८ अन्वये कारणे दाखवा

नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तसेच इतर दवाखान्यात साठा नोंदवहीत साठा प्राप्त झ ाल्याची नोंद आहे. ती बरोबर आहे.

५. संबंधिताकडून रुपये १६००/- चलन क्र.५४ दि.२/९/२००८ अन्वये वसूल करण्यात आले असुन शासन खाती जमा करण्यात आले.

६. संबंधितांकडून रु.४००/- वसूल करण्यत आले असून चलन क्र. ५० दि. २/९/२००८ अन्वये शासन खाती जमा करण्यात आले आहे.

७. संबंधितांकडून रु.९१९/- वसूल करण्यात आले असून चलान क्र.६० दि. ४/९/२००८ अन्वये शासन खाती जमा करण्यात आले. तसेच पशुधन विकास अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

८. याबाबत तत्कालीन पशुधन विकास अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देवून जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे.

९. याबाबत सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना या कार्यालयाचे पत्र क्र. ६५९/२००८ दि.२५/८/२००८ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तसेच शिस्तभंगाची नोटीस सुद्धा बजावली आहे. व सद्यस्थितीत साठा नोंदवही दप्तरी उपलब्ध आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

वाशिम जिल्हापरिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांची दिनांक २० ऑक्टोबर, २००८ रोजी साक्ष घेतली. साक्षीत सन २००३-२००४ च्या योजना त्याच वित्तीय वर्षासाठी असताना त्याच वर्षात त्या न राबविणे, साठा नोंदवहीत साहित्य वाटप पुढील वर्षात झालेले असताना ते दिनांक ३१/३/२००४ रोजी झाल्याचे खोटे दर्शविणे, साठा नोंदवहीत औषधांची कालबाह्य तारीख चुकीची लिहिणे इत्यादी मुद्दयासंदर्भात समितीने माहिती विचारली असता जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी असा खुलासा केला की, विशेष घटक योजने अंतर्गत अनुसूचित जातीच्या/नवबौध्द लाभार्थ्यांकडील पशुधनांना जंतनाशके व क्षार मिश्रणे पुरविण्याबाबत प्रशासकीय, तांत्रिक व वित्तीय मंजुरी दिनांक २४ मार्च, २००४ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत खर्चाची देयके जिल्ह्याच्या उपलब्ध असलेल्या निधीतून भागविण्यात यावीत असे निर्णयात नमूद

केलेले आहे. त्यानुसार ३० मार्चला आयुक्तांनी आदेश दिले. गोव्यातील कंपनीकडून औषधे उशिरा प्राप्त झाली. औषधांचे वाटप झालेले आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, अनुदान उशीरा मिळाले काय, नोंदवहीत चुकीच्या तारखांची नोंद का करण्यात आली? औषधांचे वाटप केव्हा करण्यात आले, इत्यादीबाबत माहिती विचारली असता असे सांगण्यात आले की, ३० मार्चला आदेश देण्यात आले. बिले निघत नाहीत म्हणून ३१ मार्चला रेकॉर्ड केले. साधारणतः जून मध्ये औषधांचे वाटप करण्यात आले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, पशुवैद्यकीय दवाखान्यांना आपण स्वतः भेटी दिलेल्या आहेत काय, त्यावेळी आपण कार्यरत होता काय ? त्यावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी असे सांगितले की त्यावेळी ते कार्यरत नव्हते. त्यावर समितीने लाभार्थ्यांना लाभ मिळालेला आहे हे आपण कशाच्या आधारे सांगत आहात तसेच नोंदवहीत नोंद केलेली आहे काय याबाबत विचारणा केली असता असे सांगण्यात आले की, नोंदवहीत नोंद आहे. चौथ्या महिन्यात औषधांचे वाटप करण्यात आले. त्यावर मुख्य लेखापरीक्षकांनी समितीला अशी माहिती दिली की, ऑडिट होईपर्यन्त म्हणजे नोव्हेंबर पर्यन्त औषधांचे वाटप झालेले नव्हते. समितीने त्यावर अशी विचारणा केली की, ३० मार्च २००४ ला औषध खरेदीबाबत आपणास आदेश देण्यात आले होते हे खरे आहे काय ? त्यावर असे सांगण्यात आले की, शासन निर्णयानुसार आयुक्त, पशुसंवर्धन यांनी दिनांक ३०.३.२००४ रोजी औषध खरेदीचे आदेश दिले व संबंधित देयके उपलब्ध तरतुदीतून भागविण्यात यावीत असे आदेश आयुक्त, पशुसंवर्धन यांच्यास्तरावर निर्गमित करण्यात आले. ७० टक्के जंतनाशकावर व ३० टक्के क्षार मिश्रणावर खर्च करावयाचा होता.

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुद्दयासंदर्भात अधिक माहिती मागविली.

(१) सदर योजनेंतर्गत दिनांक ३१ मार्च, २००४ रोजी औषधे प्राप्त झाली व त्याच दिवशी सर्व पंचायत समितींना त्यांचे वाटप करण्यात आले, परंतु पंचायत समितीच्या साठा नोंदवहीत सदर औषधे दिनांक २८ ऑगस्ट, २००४ रोजी प्राप्त झाल्याची नोंद असणे तसेच रिसोड पंचायत समितीने तर दिनांक ३१ मार्च, २००४ रोजीच औषधांचे वाटप केले असे नोंदवहीत दर्शवणे त्यामुळे याबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे याचा खुलासा करण्यात यावा व यास

जाबादार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली ? नसल्यास अद्याप पर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ?

(२) सदर योजनेंतर्गत अहवालवर्षी राज्यस्तरावर किती औषधांची आवश्यकता होती, तसेच जिल्हापरिषद निहाय किती व कोणत्या औषधांची मागणी होती व त्याप्रमाणे जिल्हा परिषद वाशिमला औषधांचा पुरवठा करण्यात आला होता काय? असल्यास केव्हा? उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

१) राज्यातील अनुसूचित जाती/नवबौध्द लाभार्थीकडील जनावरांना जंतनाशके व क्षार मिश्रणे यांचा पूरवठा करणेसाठी शासन निर्णय पशुसंवर्धन विभाग क्रं. संकीर्ण-३०२००२/४१७६०/४००/पदुम-४ दिनांक २४/३/२००४ अन्वये निर्गमित झाला. सदर शासन निर्णयाप्रमाणे जंतनाशके व क्षार मिश्रणे यांचा पुरवठा आदेश दर करारीत कंपनीला आयुक्त कार्यालयाचे पत्र क्र. डीडीडी/३०६/७७३ पंस-१६ दिनांक ३०/३/२००४ अन्वये देण्यात आले.दिनांक ३०/३/२००४ ला पुरवठा आदेश दिल्यानंतर ३१/३/२००४ पर्यंत औषधी पुरवठा होणे आवश्यक होते. परंतु प्राप्त निधीचा विनियोग होणेसाठी नियमाप्रमाणे सदर औषधे प्राप्त झाल्याची नोंद दिनांक ३१/३/२००४ ला घेण्यात आली. पुरवठा आदेश प्राप्त झाल्यानंतर राज्यात सर्व जिल्ह्यांना औषध पूरवठा करणेसाठी दर करारीत कंपनीला विलंब होणे स्वाभाविक होते. त्या प्रमाणे वाशिम जिल्ह्याला हा पुरवठा जुन २००४ मध्ये पहिल्या आठवडयात झाला.

उपरोक्त वस्तूस्थिती पाहता प्राप्त झालेल्या तरतूदीचा विनियोग करुन जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द लाभधारकाकडील जनावरांची उत्पादन क्षमता वाढविण्याची आवश्यकता असल्याने त्यांना सदर जंतनाशके व क्षार मिश्रणे मिळावीत या सदहेतुने जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांनी सदर कार्यवाही केलेली आहे. तथापि जिल्हा परिषद वाशिमद्वारे तत्कालीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचा खुलासा मागविण्यात आला होता. त्यांचा खुलासा दिनांक २२/१०/२००८ रोजी प्राप्त झाला. या सदंर्भात त्यांचे वर कारवाई करण्याची आवश्यकता नसल्याने कारवाई करण्यात आली नाही.

२) सदर योजने अंतर्गत अहवाल वर्षी रु. २३६.७० लक्ष तरतूद राज्य स्तरावर उपलब्ध करुन देण्यात आली होती. यासाठी शासन स्तरावरुन शासन निर्णया सोबत जिल्हा निहाय तरतूदी उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. यासाठी जिल्हा स्तरावरुन मागणी घेण्यात आलेली नव्हती. शासन निर्णय प्रमाणे वाशिम जिल्ह्याला उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदी प्रमाणे औषधांचा पुरवठा करण्यात आला

होता. या प्रमाणे वाशिम जिल्ह्याला जुन २००४ च्या पहिल्या आठवडयात औषध पूरवठा करण्यात आला होता.

सचिवांची साक्ष :-

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दि. २७ ऑक्टोंबर, २०१० रोजी संबंधित विभागाची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिव, ग्रामविकास विभाग यांनी असा खुलासा केला की, या संदर्भात ३१ मार्च, रोजी माहिती घेण्यात आली होती. औषधांची डिलीव्हरी २ ते ३ महिन्यात झालेली होती. प्रत्यक्षात जूनमध्ये औषधे प्राप्त झाली ही वस्तुस्थिती आहे. माहे ३१ मार्च पर्यंत पैसे लॅप्स होवू नये याकरीता धनादेश काढून ठेवण्यात आले होते. परंतु त्यांना ताबडतोब पैसे दिलेले नाहीत. प्रत्यक्ष औषधांची डिलीव्हरी झाल्यानंतर त्यांना पैसे अदा करण्यात आले आहेत यामध्ये कोणत्याही प्रकारची अफरातफर झालेली नाही. औषधांची नोंद एप्रिल महिन्यात घेण्यात आली होती. समितीने त्यावर अशी विचारणा केली की, राज्यस्तरीय औषधांचा पुरवठा होतो किंवा कसे तसेच यामध्ये अनियमितता झाली आहे काय त्यावर असे सांगण्यात आले की, राज्यस्तरीय औषधांचा पुरवठा केला जातो. यामध्ये अनियमितता झालेली आहे. माहे ३१ मार्च, पर्यंत पैसे लॅप्स होवू नये याकरिता धनादेश काढून ठेवण्यात आले होते. परंतु त्यांना ताबडतोब पैसे दिलेले नाहीत. प्रत्यक्ष औषधांची डिलीव्हरी झाल्यानंतर त्यांना पैसे अदा करण्यात आले आहेत. औषधे मिळण्याचा नोंदवहीमध्ये अनियमितता झाली होती परंतु यामध्ये कोणत्याही प्रकारची अफरातफर झालेली नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, पशुधनांना जंतु नाशके व क्षार मिश्रणे पुरविणे योजनेअंतर्गत दिनांक ३१/३/२००४ रोजी औषधे प्राप्त झाली आणि त्याच दिवशी सर्व पंचायत समित्यांना त्याचे वाटप करण्यात आले असे नोंदवहीत दर्शविले आहे याबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे. त्यावर सचिव, पशुसंवर्धन विभाग यांनी असा खुलासा केला की, विशेष घटक योजनेअंतर्गत सन २००३-०४ मध्ये रुपये ३१ लाखाचा निधी उपलब्ध करून दिला होता दिनांक २४ मार्च, रोजी शासन निर्णय झाला रेट कॉन्ट्रक्ट ३० तारखेला झाले. ३१ तारखेला खरेदीची ऑर्डर दिली एकदिवसात जिल्ह्यात सर्व ठिकाणी औषध पुरवठा करणे शक्य नव्हते. निधी लॅप्स होवू नये म्हणून औषधे प्राप्त झाल्याची नोंद दिनांक ३१/३/२००४ ला घेण्यात आली.

अभिप्राय व शिफारशी :-

विशेष घटक योजनेतंर्गत अनुसूचित जातीच्या / नवबौद्ध लाभार्थ्यांकडील पशुधनांना जंतनाशके व क्षार मिश्रणे पुरविण्याबाबत जिल्हा परिषद, वाशिमने रक्कम रुपये ९,२२,६८४/- एवढा खर्च केला आहे. औषधांची खरेदी पुरवठा व वितरण हे एकाच दिवशी म्हणजे दिनांक ३१ मार्च, २००४ रोजी झ ाल्याचे आक्षेपात नमूद करण्यात आले होते. तसेच, पंचायत समिती, रिसोड यांनी सदर औषधे दिनांक ३१ मार्च, २००४ रोजी वाटप केल्याचे दर्शविले होत. परंतु, दवाखान्यांच्या साठा नोंदवहीमध्ये दिनांक २८-८-२००४ रोजी औषधे प्राप्त झाल्याची नोंद करण्यात आलेली होती. या सर्व लेखा आक्षेपा संदर्भात जिल्हा परिषदेकडून लेखी खुलासा करताना औषधांचा पुरवठा दिनांक ३१-३-२००४ रोजी झाल्याचे व औषधांचे वाटप लाभार्थ्यांना पुढील वर्षात करण्यात आल्याचे मान्य करण्यात आले. तसेच औषधांचा पुरवठा व वाटप दिनांक ३१-३-२००४ रोजी करण्यात आल्याची नोंद घेणाऱ्या पंचायत समितीच्या संबंधितांकडून खुलासा मागविण्यात आला असल्याची माहिती समितीला देण्यात आली.

सदर योजनेस प्रशासकीय, तांत्रिक व वित्तीय मंजूरी ही दिनांक २४ मार्च, २००४ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आली होती व याबाबतचा खर्च जिल्ह्याच्या उपलब्ध असलेल्या निधीतून भागविण्याबाबत कळविले होते. त्यानुसार आयुक्तांनी ३० मार्चला आदेश दिले होते. परंतु, औषधांचा प्रत्यक्ष पुरवठा हा जून २००४ मध्ये झाला होता. औषधांसाठी उपलब्ध असलेला निधी हा ३१ मार्च नंतर लॅप्स होवू नये म्हणून जिल्हा परिषदेमार्फत एकच दिवशी औषधांचा पुरवठा, वितरण कागदोपत्री दर्शवून औषधांची खरेदी केली होती. अशी माहिती जेव्हा सचिवांकडून समितीला साक्षीच्या वेळी प्राप्त झाली तेव्हा समितीला एक प्रकारचे आश्चर्य वाटले. तसेच जिल्हा परिषदेला प्राप्त होणारा निधी व्यपगत होवू नये या उद्देशाने कागदोपत्री खोटी नोंद घेवून त्याबाबतचे धानदेश काढून ठेवण्यात येणे व औषधांचा पुरवठा झाल्यानंतर पुरवठा धारकांना पैसे अदा करणे यावरून सदर प्रकरणी संबंधितांना आर्थिक अनियमितता केल्याचे स्पष्ट दिसत असून देखील त्याबाबत संबंधितांना जाब विचारणे आवश्यक वाटले नाही उलट तत्कालीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता नाही असे सांगण्यात येणे याबाबत समितीला सखेद आश्चर्य वाटत असून एकप्रकारे सदर अनियमिततेस पाठिंबा मिळत असल्याचे दिसून येत आहे.

औषधे खरेदीसंदर्भात पुरवठादाराला द्यावयाचे धनादेश आधी काढून ठेवण्यात आल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली. एखाद्या खरेदीचे धनादेश काढताना ज्या कार्यपद्धतीचे अवलंब करण्यात येते त्याचे पालन सदर प्रकरणी झाले नसल्याची बाब जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी

यांच्या लक्षात येवूनही त्यांनी सुद्धा सदर प्रकरणी जाणीवपूर्वक दूर्लक्ष केल्याचे अनुमान समितीने काढल्यास वावगे ठरणार नाही. **सबब समिती अशी शिफारस करते की, जिल्हा परिषदेला प्राप्त होणारी तरतूद व्यपगत होवू नये म्हणून खोट्या नोंदी घेवून शासनाकडून प्राप्त झालेली तरतूद खर्च घालण्याच्या या आथिर्क अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी जेणे करून भविष्यात अशा प्रवृत्तीस आळा बसेल व करण्यात आलेल्या कारवाईची माहिती समितीला त्वरीत पाठविण्यात यावी.**

प्रकरण तीन

जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग

३.१ अखर्चित अनुदान रक्कमाबाबत :- (परिच्छेद क्र.३.२४४)

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्र.०७) जिल्हा परिषद सिंधुदूर्ग अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील सन १९९८-९९ ते २००३-२००४ या कालावधीतील अखर्चित अनुदान रक्कमांचा मेळ घेतला असता अखर्चित अनुदान रक्कमा खाते क्र.१८, ३०० व ३४३ ला एकूण रक्कम रु.१६,०१,६४,३८०/- इतकी जमा असल्याचे दिसून येते. याबाबत लेखापरिक्षकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

१) वरील अखर्चित अनुदान रक्कम वित्त विभागाच्या अधिनस्त असलेल्या खाते क्र.१८, ३०० च ३४३ ला जमा असून त्यावर बँकेमार्फत व्याज देण्यात आलेले आहे. तसेच काही रक्कम अल्पकाळासाठी मुदत ठेव योजनेत ठेवण्यात आलेले आहेत. महा.शासन ग्राम विकास विभाग परिपत्रक क्र.पंरास-१०८५/प्र.५८७/२३, दिनांक ३ डिसेंबर, १९८५ मधील निर्देशानुसार अखर्चित अनुदान रक्कमांवर जिल्हा परिषदांना मिळणाऱ्या व्याजावर शासनचा प्राधिकार आहे. यास्तव जिल्हा परिषदेकडे जमा असलेल्या अखर्चित अनुदान रक्कमांवर प्राप्त होणाऱ्या व्याजाच्या रक्कम महा.ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.

झेडपीए/२००२/प्र.क्र.४१२७/वित्त-३(२४) दि.१७ ऑगस्ट, २००२ मधील निर्देशानुसार शासन अनुदान म्हणून समजून जिल्हा परिषद अंदाजपत्रक खर्च सदरी १० टक्के व्याजाखाली शासन अनुदानातील जमा झालेल्या व्याजाची रक्कम शासनाला परत करणे, असे नवीन लेखाशिर्ष उघडून त्या लेखाशिर्षाखाली जमा करणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हापरिषद, सिंधुदूर्ग यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला.

१) सदर परिच्छेदात दर्शविण्यात आलेली वर्षे निहाय अखर्चित रक्कम रु.१६,०१,६४,३८०/- मध्ये दुरुस्ती देखभाल योजनासाठी देण्यात आलेली रक्कम रु.८,७७,२४,४९४/- एवढी आहे. तसेच वार्षिक लेख्यानुसार ताळमेळ घेतला असता परिच्छेदामध्ये जादा अखर्चित दर्शविण्यात आलेली रक्कम रु.४,८०,३७,४१९/- एवढी आहे. दुरुस्ती देखभालीसाठी देण्यात आलेली रक्कम जिल्हा फंड खाते क्रमांक ३४३ मध्ये जमा असून ती दुरुस्ती देखभाल योजनासाठी वापरली जाते. सदरची रक्कम दुरुस्ती देखभालसाठी असल्याने शासनास भरणा करण्याची आवश्यकता नाही.

त्यामुळे परिच्छेदात नमुद करणेत आलेली दुरुस्ती देखभालची रक्कम रु.८,७७,२४,४९४/- व जादा दर्शविण्यात आलेली रक्कम रु.४,८०,३७,४१९/- मिळून एकूण रक्कम रु.१३,५७,६१,९१३/- एवढी होत असून परिच्छेदात दर्शविण्यात आलेली एकूण अखर्चित रक्कम रु.१६,०१,६४,३८०/- मधून वजा जाता रक्कम रुपये २,४४,०२,४६७/- एवढीच अखर्चित रक्कम शिल्लक राहते.

सदर अखर्चित रक्कम रु.२,४४,०२,४६७/- पैकी सन १९९९-०० ते २००३-०४ पर्यंतचे समायोजित रक्कम रु.८४,४७,२८०/- असून ते वित्त विभागामार्फत शासन पत्र दिनांक २९-०९-२००६ अन्वये सर्व खातेप्रमुखांकडील येणे-देणे निश्चित होऊन रक्कम रु.२१ कोटी दि.२६-०३-०७ रोजी शासन सदरी जमा करणेत आलेली आहे. सदरची रक्कम त्यात समाविष्ठ आहे. तसेच ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत रोखीची रक्कम रु.१५,११,९५४/- चलनाने शासन सदरी जमा करणेत आलेली आहे.

एकूण अखर्चित रक्कम रु.२,४४,०२,४६७/- पैकी समायोजित रक्कम रु.८४,४७,२८०/- व रोख रक्कम रु.१५,११,९५४/- मिळून एकूण रक्कम रु.९९,५९,२३४/- शासन सदरी जमा केलेली रक्कम वजा जाता व त्याचप्रमाणे अखर्चित रोख रक्कमांना पुढील आर्थिक वर्षात खर्च करणेसाठी शासनाकडून

मान्यता घेवून त्या-त्या वर्षी खर्च करणेत आलेली आहे. आता सन २००१-०२ ते २००३-०४ पर्यंतची अखर्चित रक्कम रु.१,०२,९२,८९०/- एवढी शिल्लक असून ती खालीलप्रमाणे वर्षनिहाय आहे.

१)	सन २०००-०१	रक्कम	रु.	३,९८,६९३/-
२)	सन २००१-०२	रक्कम	रु.	५,५४,४९९/-
३)	सन २००२-०३	रक्कम	रु.	३३,६६,१४७/-
४)	सन २००३-०४	रक्कम	रु.	५९,७३,५५१/-
		एकूण रक्कम रु.		१,०२,९२,८९०/-

सन २०००-०१ पासून अनुदान निर्धारण झालेले नसल्यामुळे सदर योजनाच्या रक्कम शासन सदरी भरणा करणेत आलेल्या नाहीत. अनुदान निर्धारणाची माहिती वित्त विभागामार्फत सादर करणेत आलेली आहे. अनुदान निर्धारण झालेवर सदरचे अखर्चित रक्कम शासन सदरी भरणा करणेची कार्यवाही करणेत येत आहे. खाते क्रमांक १८, ३०० व ३४३ मधील शिल्लक रक्कमा मुदत ठेव योजनेत गुंतवणूक केल्यावर त्यावर प्राप्त होणारे एकत्रित व्याजाची रक्कम शासन परिपत्रक क्र.मविआ १०९९/प्र.क्र.३४००/२४, मंत्रालय, मुंबई, दि.२४ जून, १९९९ अनुसार जिल्हा फंडात त्या-त्या खातेक्रमांकामध्ये जमा करणेत आलेली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-

सिंधुदूर्ग जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग यांची दिनांक २८ जानेवारी, २००९ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषद सिधुदुर्ग अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील सन १९९८-९९ ते २००३-०४ या कालावधीत अखर्चित रक्कम रु.२,४४,०२,४६७/- पैकी ४१ लक्ष रुपयांचा हिशोब दिलेला नाही. याबाबतची कारणे काय आहेत ही सर्व रक्कम व्याजासहित शासनाकडे जमा करण्यात आली का त्यावर असे सांगण्यात आले की, एकूण अखर्चित रक्कम रु. २,४४,०२,४६७/- पैकी समायोजित रक्कम रु.८४,४७,२८०/- व रोख रक्कम रु.१५,११,९५४/- मिळून एकूण रक्कम रु. ९९,५९,२३४/- एवढी शासन सदरी जमा केलेली रक्कम वजा जाता तसेच अखर्चित रोख रक्कमांना पुढील आर्थिक वर्षात खर्च करणेसाठी शासनाकडून मान्यता घेऊन त्या त्या वर्षी खर्च करण्यात आली

आहे. त्यावर मुख्यलेखा परिक्षकांनी असे मत व्यक्त केले की, या सर्व रक्कमांचा हिशोब केल्यानंतर २ कोटी २ लक्ष रुपयांचा ताळमेळ लागतो. अखर्चित रक्कम रु. १,०२,९२,८९०/- शिल्लक राहते. सर्व रक्कम लक्षात घेतली तर २ कोटी ४४ लक्ष रुपये अखर्चित राहतात त्याबाबत कोणतेही उत्तर दिलेले नाही. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, लेख्ी उत्तरातील माहितीच मुख्य लेखा व वित्त अधिकारी समितीला देत आहेत. त्यांना या विषयाचा अभ्यास नाही, असे लक्षात येते. त्यांनी समितीचा वेळ घेऊ नये. समितीला जी लेखी माहिती दिली आहे ती वाचून दाखविण्यात काहीही अर्थ नाही. अधिकाऱ्यांनी समितीचे प्रश्न गांभीर्याने घेण्याची गरज आहे. मुख्य लेखापरिक्षकांनी २ कोटी ४४ लक्ष रुपये अखर्चित राहतात, असे लक्षात आणून दिले व या रक्कमेबाबतचा खुलासा समितीला करावा, अशी सूचना केली. एवढे स्पष्ट विचारल्यानंतरही लिखित माहितीच आपण समितीसमोर वाचत आहात.

समितीने पुढे जी अखर्चित रक्कम आहे ती शासन सदरी भरण्यात आली का तसेच सदर रक्कम जिल्हा परिषदेकडे ठेवण्यामागील उद्देश काय आहे अशी विचारणा केली असता सदर रक्कम लवकरात लवकर भरण्यास येईल, अखर्चित राहिलेली रक्कम शासनाची परवानगी घेऊन पुढील वर्षी खर्च करता येऊ शकेल, या उद्देशाने सदर रक्कम शासन सदरी जमा करण्यात आली नव्हती. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, एवढया वर्षातील अखर्चित रक्कम जिल्हा परिषदेच्या खाती जमा असतांना त्याबाबतचा आढावा तसेच जर ही रक्कम योजनांवर खर्च करावयाची असेल तर तशी शासनाकडून परवानगी घ्यावी लागेल. जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर अखर्चित रक्कम नियमानुसार शासन सदरी जमा करणे आवश्यक आहे. परंतु, त्यांनी तसे केले नाही. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी समितीपुढे दिलगीरी व्यक्त करुन पुढील आठवडयात सदर रक्कम शासन खाती जमा करण्यात येईल असे सांगितले.

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुद्दयांसदर्भात अधिक माहिती मागविली.

१) ग्रामिण पाणी पुरवठा विभागाकडील एकूण अखर्चित रक्कम व त्यावरील व्याज शासन खाती जमा करण्याबात शासनाचे काय निर्देष आहेत. सदर निर्देषानुसार अंमलबजावणी झाली आहे किंवा नाही याचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी कोणाची असते ?

२) शासनाच्या निर्देशाची काटेकोरपणे अंमलबजावणी न करणाऱ्या संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात आली आहे ? नसल्यास त्याचे कारण काय आहेत ?

उपरोक्त मुद्दयासंदर्भात जि.प.कडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे सन १९९८-१९९९ ते २००३-०४ पर्यंत अखर्चित राहिलेल्या रक्कमा वित्त विभागाच्या लेख्यानुसार पडताळणी करुन खालील प्रमाणे भरण्यात आलेल्या आहेत.

अ.क्र.	लेखाशिर्ष	रक्कम	शेरा
१	पाणी टंचाई २२४५-००९३	७,८२,४५४/-	शासन सदरी चलनाचे दि.१.५.२००६
२	आस्थापना	४,१८,९४५/-	शासन सदरी चलनाचे दि.२२.९.२००७
३	पाणी टंचाई २२४५-१२०८	३,१०,५५५/-	शासन सदरी चलनाचे दि.२२.१.२००८
४	शासन मान्यतेने खर्च केलेली रक्कम	६,८०,९३३/- ४,०१,९६९/-	खासदार निधी शासन मान्यतेने खर्च
५	नैसर्गिक आपत्ती (पाणी टंचाई)	११,९०,८६६/- १,८१,९७१/-	शासन सदरी चलनाने दि.२२.४.२००८ शासन सदरी चलनाने दि.२२.१.२००९
६	अभिकरण योजना (डोंगरी विकास कार्यक्रम)	३७,५९९/- १७,३६०/- १२,९२०/-	शासन सदरी चलनाने दि.१.११.२००२ शासन सदरी चलनाने दि.२०.६.२००३ शासन सदरी चलनाने

		३६९/-	दि.१८.८.२००३ शासन सदरी चलनाने दि.१९.७.२००४
७	हस्तांतरण योजनेची रक्कम रु. अभिकरण योजनेची रक्कम	८९,४६,१६९/- ३१,२८,४३२/-	शासन सदरी चलनाने दि.४.४.२००९
८	समायोजित (वित्त विभागाकडून)	८२,९१,९२५/-	शासन सदरी चलनाने दि.२६.३.२००७
	एकुण	**२,४४,०२,४६७/-**	

पाणी पुरवठा योजना प्रस्तावित, सुरु व पुर्ण झालेल्या असल्यामुळे त्या त्यावेळी अखर्चित रक्कम खर्च करण्यासाठी शासनाने परवानगी दिल्याने खर्ची घालण्यात आलेल्या आहेत.

सदर अखर्चित रक्कमांवर मिळालेले व्याज हे शासन परिपत्रक क्र.मविआ १०९९/प्र.क्र.३४००/२४ मंत्रालय, मुंबई दि. २४ जून, १९९९ नुसार त्या त्या योजनेच्या परिचलनासाठी वापरावयाचाअसल्यामुळे व्याजाची रक्कम हस्तांतर योजना/अभिकरण योजनेमध्ये जमा केलेल्या आहेत. आता शासन निर्णय क्र.जिपनि २००९/प्र.क्र.५०१९/वित्त/३/ मंत्रालय, मुंबई-३२ दि.१०/०६/२००९ अन्वये प्राप्त होणारी व्याजाची रक्कम ही जि.प. उत्पन्नाची बाब समजण्यात येऊन जि.प. च्या स्वउत्पन्नात जमा दाखवावी.

२) अखर्चित रक्कमा भरल्यामुळे कारवाई करणेचा प्रश्न उद्‌भवत नाही.

३)

सचिवांची साक्ष :-

समितीला प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दि. १५ नोव्हेंबर, २०१० रोजी संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी पाणीपुरवठा विभागाच्या सचिवांनी असा खुलासा केला की, वेळोवेळी समायोजन करावे लागते यामध्ये २ कोटी ४४ लाख ४६७ रुपये जमा करण्यात आलेले आहेत. पंचायती राज समितीने भेट दिल्यानंतर २ कोटी ४४ लाख २ हजार ४६७ रुपये रक्कमेचे समायोजन करुन ताळमेळ घालून सर्व पैसे जमा करण्यात आलेले आहेत.

अभिप्राय व शिफारशी :-

समितीला प्राप्त झालेल्या एकूण माहितीवरून असे दिसून आले की, जिल्हा परिषद सिंधुदूर्ग अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील सन १९९८-९९ ते २००३-२००४ या कलावधीतील अखर्चित अनुदानाची एकूण रक्कम रुपये १६,०१,६४,३८०/- आली. वित्त विभागामार्फत बँकेत ठेवण्यात आली व काही रक्कम आल्पकाळासाठी मुदत ठेव योजनात ठेवण्यात आली व **त्यावरील व्याजाची रक्कम शासन परिपत्रक दि.२७ जून, १९९९ नुसार जिल्हा फंडात सबंधित खाते क्रमांकाकडे जमा करण्यात आली असे करीत असताना जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग मार्फत अखर्चित रक्कमावर जिल्हा परिषदेना मिळणाऱ्या व्याजावर शासनाचा प्राधिकार असतो या शासनाच्या दि.३ डिसेंबर, १९९५ रोजीच्या शासन निर्णयाचे उल्लंघन केल्याचे सिमितीला आढळून आले. जिल्हा परिषदेमार्फत सदर अनियमिततेबाबत खुलासा करताना जिल्हा परिषदेने दिनांक १० जून, २००९ च्या शासन निर्णयाचा आधार घेतला असून सदर शासन निर्णयात अखर्चित रक्कमेवरील प्राप्त होणारी व्याजाची रक्कम ही जिल्हा परिषद उत्पनाची बाब समजण्यात येवून जिल्हा परिषदेच्या स्वउत्पनात जमा दाखवावी असे नमूद करण्यात आले आहे. परंतु, जिल्हा परिषदने सदर शासन निर्णयाचा आधार घेण्यापूर्वी लेखा आक्षेपातील रक्कम ही सन १९९८-९९ ते २००३-०४ या कालावधीची आहे या बाबीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याच दिसून येते व सदर शासन निर्णय भूतलक्षी प्रभावाने कसा लावून घेतला याबद्दल समितीला आश्चर्य वाटते.**

जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीत जिल्हा परिषदेकडे सन २००१-०२ ते २००३-०४ या कालावधीतील एकूण अखर्चित रक्कम रुपये १,०२,९२,८९०/- शिल्लक रहाण्याबाबतचा खुलासा करताना जिल्हा परिषदेने सन २०००-०१ पासून अनुदान निर्धारण न झाल्याने सदर रक्कम शासन सदरी जमा करण्यात आली नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. यावरून असे दिसून येते की, सदर रक्कम ह्या जिल्हा परिषदेकडे बऱ्याच वर्षापासून पडून आहेत. शासनाकडून प्राप्त होणारा निधी हा लोकापयोगी योजनांवर खर्च करणे अपेक्षित असताना त्याचा विनियोग सार्वजनिक सुख-सुविधा पुरविण्यासाठी न करता सदर रक्कम बँकेत जमा ठेवली जाणे ही बाब निश्चितच जिल्हा परिषद प्रशासनास शोभनीय नाही. वास्तविक सदर बाब जिल्हा परिषदचे मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच संबंधित विभागाच्या प्रमुखांच्या तात्काळ निदर्शनास येणे आवश्यक होत व त्यासंदर्भात योग्य ते मार्गदर्शन घेवून सदर रक्कमा लोकोपयोगी योजनेवर खर्च करणे किंवा शासन सदरी जमा करणे आवश्यक होते. परंतु, या

प्रकरणी संबंधितांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. **शासनाकडून प्राप्त झालेला निधीचा वापर हा शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार तसेच मार्गदर्शक सूचनानूसार करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर असताना त्यांनी सदर प्रकरणी योग्य ती काळजी घेतली नसल्याचे दिसून येते. जिल्हा परिषदेकडे असलेली अखचिर्त रक्कम ही जवळपास पाच ते सहा वर्षापूर्वीची आहे त्याचे समायोजन सन २०१०-११ मध्ये करण्यात येवून शिल्लक रक्कम शासन खाती जमा करण्यात आली आहे. सबब, सदर प्रकरणी झालेल्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन योग्य ती कारवाई करण्यात यावीत. अन्यथा भविष्यात जिल्हा परिषदेमार्फत अखचिर्त निधीचे समर्थन करताना रक्कमेचे समायोजन शासनामार्फत लवकर करण्यात आले नाही. अनुदानाचे निर्धारण करण्यात आले नाही अशा सबबी केल्या जातील तसेच जिल्हा परिषदेकडे अखचिर्त राहण्याच्या रकमेवर वित्त विभागाने देखील लेख्याची पडताळणी करून नियंत्रण ठेवावे व वेळोवेळी संबंधितांना मार्गदर्शन करावे अशी शिफारस समिती करीत आहे.**

समितिने केलेल्या उक्त शिफारशींवर केलेल्या कार्यवाहीची माहिती दोन महिन्यांच्या आत पुरविण्यात यावी. अशी शिफारस समिती करीत आहे.

परिशिष्ट
समितीच्या बैठचे संक्षिप्त कार्यवृत्त

गुरुवार, दिनांक २५ सप्टेंबर, २००८
स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, अकोला

उपस्थिती

१. श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.रमेशभाई कदम, वि.स.स.

३. श्री.माणिकराव जगताप, वि.स.स.

४ श्री.संपतराव अवघडे, वि.स.स.

५ श्री.श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

६ श्री.डी.एस.अहिरे, वि.स.स.

७ श्री.आशिष जयस्वाल, वि.स.स.

८ श्री.अण्णासाहेब माने-पाटील, वि.स.स.

९ श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

१० श्री.पी.टी.कांबळे, वि.स.स.

११ श्री.हेमंत पटले, वि.स.स.

१२ श्री.राजन तेली, वि.प.स.

१३ श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

१४ श्री.व्रिकम काळे, वि.प.स.

१५ श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री.वि.वा.देशमुख, उप सचिव
श्री.ता.नि.मिसाळ, अवर सचिव
श्री.एस.बी.गायकवाड, कक्ष अधिकारी
श्री.सुभाष नलावडे, कक्ष अधिकारी

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय.
श्री.ए.एस.मोर, उप सचिव.
श्री.कृ.शे.कांबळे, अवर सचिव

मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी (लेखा) :
श्री.अ.बा.सावंत, मुख्य लेखा परीक्षक.

अकोला जिल्हापरिषदचे अधिकारी :-

१. श्री.नितिनकुमार खाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी

२. श्री.चंद्रकांत गुडेवार, अति मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)

३. श्री.वा.वा.खर्चे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

४. डॉ.कमलकिशोर फुटाणे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

५. डॉ.जी.के.रचकंुटवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

६. श्री.एस.जी.जवंजाळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण

७. श्रीमती यु.डी.उबरहांडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन

८. श्री.एस.सी.जुमाडे, शिक्षणाधिकारी, माध्यमिक

९. श्री.प्रकाश जाधव, शिक्षणाधिकारी, प्राथमिक

१०. श्री.दि.बु.पाटील, कार्यकारी अभियंता, बांधकाम

११. श्री.जी.बी.बेहळे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

१२. श्री.एस.बी.बांबळ, कृषी विकास अधिकारी

१३. डॉ.वि.ह.देशपांडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

१४. श्री.शरद सोनवणे, प्रभारी कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग

१५. श्री.एस.एम.कापुलवार, कार्य.अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने अकोला जिल्हापरिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी यांची सन २००३-२००४ लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील अकोला जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

सोमवार, दिनांक २० ऑक्टोबर, २००८
स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, वाशिम

उपस्थिती

१. श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री.नाना पंचबुद्धे, वि.स.स.
३. श्री.माणिकराव जगताप, वि.स.स.
४. श्री.सुभाष बने, वि.स.स.
५. श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.
६. श्री.हेमंत पटले, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.ता.नि.मिसाळ, अवर सचिव

विभागीय प्रतिनिधी
ग्रामविकास विभाग
श्री.एस.मोरे, उप सचिव
श्री.कृ.शे.कांबळे, अवर सचिव

मुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी (लेखा),
श्री.अ.बा.सावंत, मुख्य लेखा परीक्षक.

वाशिम जिल्हा परिषदेचे अधिकारी

१. श्री.विक्रमकुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी
२. श्री.आर्यन गावित, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
३. श्री.पी.ए.देवऋषी, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.य.
४. श्री.जे.एस.इनामदार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (सा.) प्रभारी
५. श्री.भारत कडुकार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.)
६. श्री.व्ही.जी.रोड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जलस्वराज्य
७. श्री. डी.जी.चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी, प्रभारी
८. श्री.एम.व्ही.देशमुख, कृषी विकास अधिकारी
९. श्री.बी.बी.जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, प्रभारी
१०. श्री.पी.पी.खंडागळे, कार्यकारी अधिकारी, बांधकाम
११. श्री.एम.एम.पराते, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन

१२. श्री.आर.डी.सावळकर, कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु. (प्रभारी)

१३. श्रीमती सोनकवडे, समाजकल्याण अधिकारी

१४. डॉ.आर.आर.वडते, जिल्हा पशसंवर्धन अधिकारी

१५. श्री.एन.आर.चव्हाण, शिक्षणाधिकारी (प्राथ) (प्रभारी)

१६. श्री.ए.टी.तायडे, उप अभियंता (प्रभारी) भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा

१७. श्री.बी.एन.ठाकूर, वरिष्ठ, भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण् विकास यंत्रणा

१८. श्री.कवाने, शिक्षणाधिकारी, माध्यमिक

१९. श्री.एस.एम.कोरडकर, शिक्षणाधिकारी, (निरंतर शिक्षण)

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने वाशिम जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षापुनर्विलोकन अहवालातील वाशिम जिल्हापरिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २८ जानेवारी, २००९
स्थळ : जिल्हापरिषद सभागृह, सिंधुदूर्ग

उपस्थिती

१. श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स.तथा समिती प्रमुख

२. श्री.रमेशभाई कदम, वि.स.स.

३. श्री.संपतराव अवघडे, वि.स.स.

४. श्री. सुभाष बने, वि.स.स.

५. श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

६. श्री. अतुल देशकर, वि.स.स.

७. श्री. टी.पी.कांबळे, वि.स.स.

८. श्री.हेमंत पटले, वि.स.स.

९. श्री.राजन तेली, वि.प.स.

१०. श्री.विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.

११. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री.वि.वा.देशमुख, उपसचिव

ग्रामविकास विभाग :

श्री.प्र.बा.हिरलेकर,उप सचिव

श्री.कृ.शे.कांबळे, अवर सचिव

सिंधुदूर्ग जिल्हापरिषदचे अधिकारी :-

१. श्री.राहूल रंजन महिवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी.

२. डॉ.सुभाष पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी.

३. श्री.पी.बी.पाटील, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.य.

४. श्री.एस.बी.शेळके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, वरिष्ठ

५. श्री.ए.डी.कांबळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी

६. श्री.शि.श.सुर्यवंशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं).

७. श्री.वसंत विष्णू सागर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण).

८. श्री.किसन पवार, शिक्षणाधिकारी, प्रथमिक

९. श्री.बी. एम किल्लेदार, शिक्षणाधिकारी माध्यमिक

१०. श्री.प्रशांत पाटील पाटील, कायर्कारी अभियंता, बांधकाम

११. श्री.आ. द. शिंदे, कायर्कारी अभियंता, लधु पाटबंधारे

१२. श्री.न. बा. भोई, का.अ.ग्रा.पा.पु.व जिल्हा मुल्यंकन व सनियंत्रण चमू, जलस्वराज्य प्रकल्प.

१३. डॉ.आर.व्ही. कुलकणीर्, जिल्हा आरोग्य अधिकारी.

१४. श्री.एम.डी. वेताळ, कृषि विकास अधिकारी.

१५. डॉ.एस. बी. ठाकूर, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी.

१६. डॉ.एस. जे. पवार, अतिरिक्त जि. आ. अधिकारी.

१७. श्री.सदाशिव शेळके, वरिष्ठ लेखाधिकारी (वर्ग-१)

१८. श्री.चारुदत्त मराठे, शिक्षण अधिकारी, निरंतर शिक्षण.

१९. श्री. व्ही. व्ही. सागर, जिल्हा सुलभिकरण गट प्रमुख, जलस्वराज्य

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने सिंधुदूर्ग जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षापुनर्विलोकन अहवालातील सिंधुदूर्ग जिल्हापरिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१०
स्थळ : विधान भवन मुंबई

उ प स्थि ती

१. श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख
२. श्री. सुरेश खाडे, वि.स.स.
३. ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.
४. श्री. हणमंतराव पाटील-बेटमोगरेकर, वि.स.स.
५. प्रशांत ठाकूर, वि.स.स.
६. श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.
७. श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
८. श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.
९. श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.
१०. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.
११. श्री. दादाजी भुसे, वि.स.स.
१२. प्रा. सुरेश नवले, वि.प.स.
१३. श्री.विक्रम काळे, वि.प.स.
१४. श्री.सय्यद पाशा पटेल, वि.प.स.
१५. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.विलास आठवले, अवर सचिव

मुख्य लेखापरिक्षक स्थानिक निधी (लेखा)
श्री. शं.धे.चव्हाण, सहमुलेप, स्थानिक निधी,लेखा

विभागीय प्रतीनिधी

(१) श्री. संजयकुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग
(२) श्रीमती मालिनी वि. शंकर, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
(३) श्री. सुनील पोरवाल, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, जलसंधारण विभाग
(४) श्री. पी.एस.मीना, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग
(५) श्री.जयंत बाँठिया, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग
(५) डॉ.एस.के.गोयल, प्रधान सचिव, सहकार पणन विभाग
(६) श्री.व्ही.गिरीराज, सचिव जलसंधारण व रो.ह.या.विभाग
(७) श्री. राजेश अग्रवाल, सचिव, (वित्त) विभाग
(८) श्री.अ`.जी.वाजे, प्रभारी मु.का.अ.अकोला

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात अकोला जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, जलसंधारण विभाग, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, प्रधान सचिव, सहकार पणन विभाग, सचिव जलसंधारण व रो.ह.या.विभाग, सचिव, (वित्त) विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार दिनांक २७ ऑक्टोबर, २०१०

स्थळः विधान भवन, मुंबई.

उपस्थिती

१) श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. समिती प्रमुख

२) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

३) श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

४) श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

५) श्री.खुशाल बोपचे, वि.स.स.

६) श्री.सुरेश खाडे, वि.स.स.

७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.

मुख्यलेखा परीक्षक, स्थानिक निधी (लेखा)
श्री.प्र.वा.पांढरीपांडे, मुख्य लेखा परिक्षक
विभागीय प्रतीनिधी
श्री.सुधीर ठाकरे - सचिव. ग्रामविकास विभाग
श्री.गिरीराज, सचिव, नियोजन, रो.ह.यो.
श्री.सतिश गवई, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय
श्री.संजय कुमार - प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग
श्री.अनिल डिग्गीकर, सचिव, कृषि व प.दु.म. (पशुसंवर्धन विभाग)
जिल्हा परिषद, वाशिम
श्री.जे.एस.माळाकोळीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
डॉ.सुभाष पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात वाशिम जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, नियोजन, रो.ह.यो., प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव, कृषि व प.दु.म. (पशुसंवर्धन विभाग) यांची साक्ष घेतली.

सोमवार दिनांक १५ नोव्हेंबर, २०१०
स्थळ : विधान भवन,मुंबई

उपस्थिती

१) श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.
३) श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
४) श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.
५) श्री. विष्णू सावरा, वि.स.स.
६) श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.
७) श्री. नितीन भोसले, वि.स.स.
८) प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

मुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी (लेखा
श्री.शं.धे.चव्हाण

विभागीय प्रतीनिधी
श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणी पुपरवठा व स्वच्छता विभाग
श्री.सुधीर ठाकरे, सचिव, ग्रामविकास विभाग

संक्षिप्त कार्यवृत्त :

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्दता विभाग व सचिव, ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेतली.

दिनांक - १८ एप्रिल, २०११
स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

१ श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२ श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

२ श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

४ श्री. सुरेश खाडे, वि.स.स

५ श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

६ श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

७ ॲड. उषा दराडे, वि.प.स.

८ श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

९ श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.भा.ना.कांबळे, सह सचिव.
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव.

संक्षिप्त कार्यवृत्त

समितीने बैठकीत समितीच्या पाचवा अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणासह संमत केले.